https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -१३२ शुक्रवार,दि.१७ जानेवारी २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-132 Friday, Dt.17 January 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## अंबाजोगाई शहरात अज्ञात हल्लेखोरांनी केला सुजित सोनी या व्यापाऱ्यावर प्राणघातक हल्ला

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई शहरात अज्ञात हल्लेखोरांनी केला सुजित सोनी या तरुण व्यापाऱ्यावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना आज रात्री ९ ते ९.१५ वाजण्याच्या सुमारास घडल्याने शहरात खळबळ उडाली आहे.सुजित श्रीकिशन सोनी यांची नगर परिषद परिसरात कोलगेट सह अन्य कंपन्यांची एजन्सी असून ते काल रात्री ९ ते ९.१५ च्या दरम्यान आपले दुकान बंद करून आपल्या दुचाकीवरून परत जात असताना शासकीय विश्राम गृहाच्या पुढे पोलीस कॉलनी नजीक मोबाईल आल्याने बोलत थांबले असता मागून दुचाकीवर आलेल्या अज्ञात तीन हल्लेखोरांनी त्यांच्यावर कोयत्याने प्राण घातक हल्ला केला.

# धनंजय मुंडेंचा परळीत जनता संवाद:जगमित्र कार्यालय गजबजले, नियमित प्रमाणे प्रभू वैद्यनाथांचे घेतले दर्शन

बीड - नियमित प्रमाणे परळीत आल्यानंतर आज राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी परळी येथील आपल्या जगमित्र या कार्यालयामध्ये बसून मतदारसंघातून व मतदारसंघ बाहेरून आलेल्या नागरिक कार्यकर्ते तसेच पदाधिकारी यांच्याशी संवाद साधत त्यांची कामे अडचणी समजून घेतल्या तसेच ती मार्गी लावण्याबाबत संबंधितांना योग्य त्या सूचना देत संबंधितांची कामे मार्गी लावली.

जागच्याजागीच काम मार्गी लावण्याचा शैलीमुळे धनंजय मुंडे यांच्या जनता संवाद उपक्रमास नेहमीच गजबजलेली गर्दी पाहायला मिळते. आजही धनंजय मुंडे जगमित्र कार्यालयात दाखल झाल्यानंतर पदाधिकारी कार्यकर्ते त्याचबरोबर परळी व परळी बाहेरील नागरिकांनी जगमित्र हे धनंजय मुंडे यांचे कार्यालय गजबजलेले पाहायला मिळाले.मंत्री धनंजय मुंडे हे परळीत असल्यानंतर नियमित प्रभू वैद्यनाथांच्या दर्शनाला जातात. आजही घराबाहेर पडतात त्यांनी सर्वप्रथम बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथांचे मनोभावे दर्शन करून विधिवत पूजन केले व त्यानंतर ते जनता संवाद उपक्रमासाठी त्यांच्या जगमित्र या कार्यालयात दाखल झाले.

दरम्यान, मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांच्या जवळचा असलेला वाल्मीक कराडवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे विरोधकांकडून तसेच महायुतीमधीलही काही नेत्यांनी व आमदारांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. तसेच त्यांची देखील चौकशी व्हावी अशी मागणी देखील आता जोर धरू लागली आहे. आता यावर धनंजय मुंडे काय निर्णय घेतात किंवा पक्ष प्रमुख अजित पवार काय निर्णय देतात






# देशमुखांच्या मारेकऱ्यांना लपविणाऱ्यांचाही हिशोब होईल

## आरोपी संख्या पन्नास वर जाईल खा. बजरंग सोनवणे यांची प्रतिक्रिया

केज/प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांचा तपास सुरूआहे.दरम्यान, अपहरण करताना स्विफ्ट गाडी कोणाची होती ? मारेकऱ्यांना राहायला कोणी घरं दिली ? या सगळ्या गोष्टी तपासात स्पष्ट होतील.खंडणी मधील जे आरोपी होते ते कोणाच्या घरात होते ? त्यांना कोणी गाड्या पुरवल्या हे सगळं समोर येईल आणि त्यांचाही हिशोब होईल.इतकेच नाही तर या प्रकरणात आरोपींची संख्या पन्नास वरजाईल अशी प्रतिक्रिया खा.बजरंग सोनवणे यांनी माध्यमांशी बोलतानादिली आहे.




खा.बजरंग सोनवणे यांच्यावर संतोष देशमुख यांच्या खुनाशी संबधित असलेलाआरोपी वाल्मिक कराड यांच्या पत्नीने वाल्मिक कराड यांना लोकसभा निवडणूकीनंतर जिवे मारण्याची धमकी दिली होती असा आरोप केल्या नंतर माध्यमांशीबोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले की,उभ्या आयुष्यात मी कधीही कोणाला धमकी दिली नाही.उलट लोकसभा निवडणूकीचा निकाल सुरू असताना बाहेर मलाच दमदाटी केल्याच्या खबरा पेरल्या गेल्या.त्यात काही लोकांनी स्वत:ची वाहवाही करून घेतली. मात्र,निकाल सुरू असताना असे काहीही झाले नव्हते.मी त्यावेळी धमकी दिली तर कराड ताईंनी त्याच वेळेस का सांगितले नाही ?आता सहा महिन्याने काहीही आरोप करण्याचे त्यांचे काम सुरू आहे.त्याबाबत फारसे न बोललेले बरे दरम्यान,संतोष देशमुख यांचा क्रुरपणे खून करण्यात आला.ही घटना मानवतेला काळीमा

(उर्वरीत पान २ वर)

## मा.मुख्यमंत्र्यांनी पालकमंत्री पदच रद्द करावे -प्रा.सुरेश नवले

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्रात सध्या पालकमंत्री पद हे कळीचे पद होऊन बसले आहे. कधी काळी महाराष्ट्रात पालकमंत्रीपद नव्हते, खरं तर पालकमंत्री पदाची गरजच नाही, जिल्ह्याचे पालकमंत्री जिल्ह्याचे मुख्यमंत्री समजून काम करतात. अधिकार एकवटल्यामुळे सत्तेचे केंद्रिकरण झाले आणि त्यामधून गैरप्रकार वाढीस लागले. अवैध मार्गाने वसूलीचे उद्योग सुरू झाले, टक्केवारी बोकाळली, विविध विभागांना निधी देण्याच्या मोबदल्यात टक्केवारी वसुल केल्या जाऊ लागली, हे एखादा दुसरा



जिल्हा अपवाद वगळता महाराष्ट्रात सर्रास घडत आहे. उघड्या डोळ्यांनी पाहण्यापलीकडे मा.मुख्यमंत्री काहीच करू शकत नाहीत, कारण त्यांचे ते मंत्रिमंडळातील सहकारी आहेत. पालकमंत्री पद नसल्यामुळे विकासाला खिळ बसते वगैरे हे धांदात असत्य


(उर्वरीत पान २ वर)

## पतंग उडवताना नायलॉन मांजा टाळा- जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात

बीड ।प्रतिनिधी

पतंग उडवताना नायलॉन मांजाचा वापर टाळा.नायलॉन मांजा दुसऱ्याचा जीव घेऊ शकतो, पतंग उडवताना काळजी घ्या. असे आवाहन बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी केले आहे. बीड शहरातील सावता माळी चौकात एका दुचाकीस्वाराच्या गळ्याला नायलॉन मांजा अडकल्याने तो जखमी झाला. सुदैवाने त्याच्या लक्षात आल्याने दुर्घटना टळली आणि तो बाल बाल बचावला. मात्र त्याच्या गळ्याला आणि हाताला जखम झाली आहे.. बीड शहरात आणि जिल्ह्यात अनेक ठिकाणी पतंग उडवताना काळजी घेतली जात नाही. त्यातून गंभीर अपघात होवू शकतात. असे अपघात टाळण्यासाठी नायलॉन मांजाचा वापर टाळा. याचबरोबर नायलॉन मांजा कुणी वापरत असेल तर प्रशासनाला कळवा असे आवाहनही डॉ अशोक थोरात यांनी केले आहे. नायलॉन मांजा विक्री आणि वापरावर बंदी आहे. कुणी विक्री करतं असेल तर गुन्हा दाखल होवू शकतो.

नायलॉन मांजा जीव घेऊ शकतो काळजी घ्या



## हरवलेल्या मुलीचा लवकरात लवकर शोध लावण्यात यावा

### जमात ए इस्लामी हिंद महिला शाखेची मागणी

अंबड ।प्रतिनिधी

रविवार दिनांक १२ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता शहरातून अचानकपणे बेपत्ता झालेली मुलगी इकरा अमजद शेख हिचा लवकरात लवकर शोध लावण्यात यावा अशी मागणी जमात ए इस्लामी हिंद अंबड महिला शाखेच्या वतीने करण्यात आली.या संदर्भात महिला शाखेच्या एका प्रतिनिधी मंडळ ने पोलिस उप अधीक्षक यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. सदर



निवेदनात म्हटले आहे की शहरातील फैसलाबाद भागातील रहिवासी एक तीन वर्षाची मुलगी इकरा अमजद शेख ही आपल्या राहत्या घराजवळ खेळत असताना रविवार १२ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता पासून बेपत्ता झालेली आहे. पाच दिवस उलटून ही अजून तिचा काही थांगपत्ता लागलेला नाही. ज्यामुळे सदर मुलीच्या आईवडिलांची अवस्था खराब झाली आहे. तसेच शहरातून एक निरागस मुलगी बेपत्ता होणे ही एक गंभीर बाब असून पोलिस आणि प्रशासनासमोर एक मोठे आव्हान उभे राहिले आहे. सदर मुलगी बेपत्ता झाल्याने शहरातील सर्वच नागरिक हळहळ व्यक्त करीत आहे. या घटनेनंतर शहरातील पालकवर्गाची चिंता अधिकच वाढली आहे. आपल्या लहान लहान लेकरांच्या भविष्यातील सुरक्षेबाबत ते भयभीत झाले असल्याचे चित्र दिसून येत आहे.

(उर्वरीत पान २ वर)

## आ.संदीप क्षीरसागरांची नवीन संकल्पना

### प्रशासन आता मतदारसंघातील गावोगावी जाणार

### शासकीय योजनांची माहिती गावकऱ्यांना देण्यासाठी जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात कॅम्प

बीड ।प्रतिनिधी

ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांना शासनस्तरावरील योजनांची माहिती देण्यासाठी गावोगावी जाऊन प्रशासनाने शिबीर घ्यावेत आणि सर्वसामान्य नागरिकांना विविध योजनांची माहिती द्यावी अशी नवीन संकल्पना आ.संदीप क्षीरसागर यांनी सुचवून याबाबतचा कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आता जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात बीड तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन प्रशासनाकडून शिबीर घेण्यात येणार आहेत.



शासनाच्या योजना विविध योजना शेतकरी, दुर्बल घटक आणि सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी अधिक प्रभावी मार्गाचा अवलंब केला जावा. या हेतूने आ.संदीप क्षीरसागर यांनी नवीन संकल्पना सूचविली. महसूल विभाग, कृषी विभाग, ग्रामविकास विभाग यांसह इतर विभागांच्या अधिकारी व कर्मचारी यांनी गावोगावी जाऊन संयुक्तरित्या शिबीर घ्यावेत. या शिबीरांमध्ये प्रत्येक घटकातील लोकांसाठी असलेल्या योजनांची त्या-त्या लोकांना देऊन त्यांना असलेल्या शंका

(उर्वरीत पान २ वर)

# पाटोदा गावात पिसाळलेल्या वानराचा हैदोस

## ६ जणांना घेतला चावा, लोणीकर यांच्या आदेशानंतर पिसाळलेल्या वानराला केलं बंदिस्त

जालना ।प्रतिनिधी

गावातील लाईट बंद आहे, पाणीपुरवठा खंडित आहे, ग्रामसेवक ऐकत नाही, तलाठ्याकडे काम अडकले आहे, इथपासून ते वन्य प्राणी शेतीचे नुकसान करत आहेत, गावात पिसाळलेल्या वानराने हैदोस माजवला आहे, परिसरात बिबट्या आढळला किंवा एखादी नैसर्गिक आपत्ती आली अशावेळी काम करणाऱ्या लोकप्रतिनिधींची जशी आठवण केली जाते तशीच आठवण मतदान करताना देखील प्रत्येकाने करावी अशी परिस्थिती आणि चर्चा आज मंठा तालुक्यातील पाटोदा गावात प्रत्येक ओट्यावर रंगली आहे.

मंठा तालुक्यातील बोराडे पाटोदा हे एक प्रकारे राजधानीचे गाव मानले जाते. आमदार लोणीकर यांनी पाटोदा गावाच्या सर्वांगीण विकासासाठी शक्य ते सर्व प्रयत्न केले कोट्यावधी रुपयांचा विकास निधी या ठिकाणी दिला असे असले तरी यांना या गावात मतदानाच्या बाबतीत मात्र त्यांना दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. ज्या लोकांना गावाने मताधिक्य मिळवून दिले त्यांना या गावासंदर्भात किंवा गावाच्या समस्यांसंदर्भात कुठलीही जाण किंवा देणे घेणे नाही संकट समयी मात्र फक्त आमदार

(उर्वरीत पान २ वर)



शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
ॲडव्हान्स ॲनोरेक्टल (पाईल्स) लेझर सेंटर
डॉ. प्रशांत श.ढाकणे
M.B.B.S., M.D. (Anaesthesia)
भुलतज्ञ
डॉ.मीरा प्र.ढाकणे (नागरे)
B.A.M.S., M.S. (Shalya)
मुळव्याध, भगंदर व लेबर सर्जन
आपल्या बीड शहरामध्ये प्रथमच..... महिला मुळव्याध तज्ञ
डॉ. सौ. मीरा प्र. ढाकणे (नागरे) महिला रुग्णांच्या तपासणी करीता उपलब्ध राहतील
मुळव्याध करीता विशेष उपचार
* लेजर उपचार
* इंजेक्शन उपचार
* ऑपरेशन उपचार
* क्षारसुत्र उपचार,
* मुळव्याध, भगंदर
* फिशर, मलबध्दता
* संडासवाटे रक्तस्त्राव होणे.
* बस्ती उपचार
* स्तनातील गाठी
* शरीरावरील सर्व प्रकारच्या गाठी
* स्तनामध्ये पु होणे.
* मोस, जामखीळ व कुरुप काढणे
* गर्भावस्था किवा प्रसुतीनंतर
* मुळव्याध करीता विशेष आयुर्वेद उपचार
हॉस्पीटलचा पत्ताशिवसमर्थ मुळव्याध हॉस्पीटल साई कॉम्पलेक्स, आदर्श नगर, डि.पी.. रोड बसस्टॅन्डच्या पाठीमागे, डॉक्टर लाईन, बीड मो.क्र.9623079009

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# नायकांची शोकांतिका

एखाद्या कर्तृत्ववानास नायकपद द्यायचे. त्याच्याभोवती सारे विश्व गरगरा फिरवायचे. आणि त्याच्याविना जणू विश्वाचे व्यवहारच ठप्प पडतील, अशी धारणा राखायची ही आपल्याकडील सर्वसामान्य मनोवृत्ती. अशा मनोवृत्तीतून व्यक्तिप्रेम व्यक्तिस्तोमापर्यंत येऊन पोहोचते. त्यात नुकसान नायकाचे, समाजाचे आणि मुख्य म्हणजे व्यवस्थेचे. कारण अशा धारणेतून व्यवस्था दुय्यम होत जाते.

नायक 'लार्जर दॅन लाइफ' असे होत जातात. आणि असे नायक अपयशी झाले की सगळ्या पातळ्यांवर गडबड उडते. भारताच्या क्रिकेट संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्धची कसोटी मालिका गमावणे, संघातील नायक सपशेल अपयशी ठरणे हे सगळे सध्या जे सुरू आहे त्यास अनेक कारणे आहेत. मात्र, त्यातले एक महत्त्वाचे कारण आहे तो आपल्याकडे सगळीकडेच बोकाळलेला 'नायकवाद'! मुळात भारतीय संघाच्या या अपयशाला पार्श्वभूमी होती ती न्यूझीलंडविरुद्ध मायदेशातील मालिकेतील दारूण पराभवाची. तसल्या दारूण पराभवानंतर ऑस्ट्रेलियासारख्या संघाच्या मायभूमीत बाजी मारणे शक्य होते का, हाच प्रश्न आहे. अर्थात, या पराभवाची चर्चा काही दिवस होईल. इंग्लंडविरुद्धच्या मर्यादित षटकांच्या मालिकेत घरच्या मैदानावर यश लाभले की ती मागे पडेल आणि आयपीएलचा सर्वव्यापी झगमगाटी जल्लोष सुरू झाल्यावर तर ती विस्मरणातही जाईल!

येथे मुख्य मुद्दा या पराभवातून भारतीय संघ काही धडा शिकणार आहे का, हा आहे. राहुल द्रविड यांनी त्यांच्या प्रशिक्षकपदाच्या कालावधीतील अखेरच्या कसोटीच्या वेळी, 'सातत्य राखा आणि खडतर आव्हान पेलायची तयारी ठेवा,' अशी सूचना केली होती. द्रविड यांनी दिलेला हा मंत्र कसोटीसाठी जणू विसरला गेला. द्रविड प्रशिक्षक असताना भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेत पहिली कसोटी गमावल्यानंतर मालिका बरोबरीत सोडवली होती. इंग्लंडविरुद्ध मायदेशात सलामीची कसोटी गमावल्यावर मालिका ४-१ अशी जिंकली होती. द्रविड यांच्या कारकीर्दीची सांगता झाली आणि त्याच वेळी काही वरिष्ठ खेळाडूंनी सूर गमावला.

सोबत सदोष संघनिवडीचा जबर फटका बसला. न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेसाठी आधी राखीवही नसलेला वॉशिंग्टन सुंदर पहिल्या कसोटीतील पराभवानंतर थेट संघात आला. हर्षित राणा दीर्घ मारा करू शकत नाही, हे पहिल्या कसोटीत स्पष्ट झाल्यावरही त्याला दुसऱ्या कसोटीत संधी मिळाली. संघात परतलेल्या रोहित शर्माने मधल्या फळीत खेळायचे ठरवले; मात्र तो चौथ्या कसोटीच्या वेळी आला सलामीस! अर्थात आपल्या धावा होत नसल्याचे बघून रोहितने पाचव्या कसोटीत न खेळण्याचा निर्णय घेतला; निदान तसे सांगण्यात आले. मग धावा न होणाऱ्या विराट कोहलीबाबत असे का घडले नाही? माइकसमोर नवोदितांना सल्ले देताना, आपण काय कर्तृत्व गाजवत आहोत, याचे आत्मपरीक्षण या नायकांना करावेसे वाटत नाही का?

चौथ्या कसोटीत सदोष फटक्यामुळे ऋषभ पंतची विकेट गेली. सन १९८४च्या इंग्लंडविरुद्धच्या दिल्ली कसोटीत बेजबाबदार फटका मारल्यामुळे कपिल देव आणि संदीप पाटील या दोघांना संघातून वगळले होते, त्याचे स्मरण या निमित्ताने होते. पण, सदोष फटक्यासाठी पंतवर कुठलीही कारवाई झाली नाही. यासोबतच एक प्रश्न पडतो तो असा की, आयपीएलमध्ये चमकणारे वेगवान गोलंदाज कसोटीच्या वेळी जातात कुठे? बुमराहव्यतिरिक्त एकही प्रभावी गोलंदाज संघात नाही, हे लक्षातच घेतले जात नाही? भारताची पुढील कसोटी मालिका इंग्लंडविरुद्ध आहे. तोपर्यंत रोहित शर्मा, विराट कोहली, रवींद्र जाडेजा हे आपल्या कसोटी भविष्याबाबत 'निर्णय' घेतील, अशी अपेक्षा आहे; अर्थात, त्यांना तसे सांगण्याचे धैर्य कोणाकडे असेल, असे वाटत नाही.

यश मिळवायचे तर आक्रमकता, जोष यांसोबत कामगिरीही तशीच हवी. यशाची आस, आक्रमकता आणि संयम हा मंत्र कसोटीतील यशासाठी महत्त्वाचा आहे, हे संघातील अनेक खेळाडूंना सांगण्याची गरज निर्माण झाली आहे. मात्र, आयपीएलमध्ये संघाचे नेतृत्व करण्याचा अनुभव असलेल्यांना हे सांगण्याचे धैर्य कोण करणार? कसोटीत यशस्वी होण्यासाठी रणजी स्पर्धेतील उर्वरित सामने खेळण्याची सूचना करण्याचे धारिष्ट्य आहे कुणाकडे? तुम्ही हे सामने नाही खेळलात तर संघाबाहेर बसवू, असे सांगण्याची हिंमत आहे कुणाकडे? ती नाही म्हणून तर नायकांची शोकांतिका आपल्या पाचवीला पुजलेली आहे. याचे भान आपल्याला कधी येणार?

दै.समर्थ राजयोग दि.१७/०१/२०२५

**CHANGE IN NAME**

I Declare by this publication about
Change In My Name
Old Name : Swati Shahajirao Kolhe
New : Swati Ganesh Pokale

**Address : At.Post.Chandegaon, Tq.& Dist.Beed Mo.9423405116**

# महारेशीम अभियान चित्ररथ जिल्ह्यात रवाना

बीड ।प्रतिनिधी

जिल्हा रेशीम उद्योग कार्यालयामार्फत आयोजित महारेशीम अभियानाचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी मोकाटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपाध्यक्ष शामसुंदर पडुळे, उपस्थित होते. यावेळी रेशीम विभागाकडून तयार केलेल्या रथास निवासी उपजिल्हाधिकारी यांनी हिरवी झेंडी दाखवून रेशिम अभियानाची सुरुवात केली. हे अभियान ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ पर्यंत असून विभागाकडून गावोगावी कार्यक्रमाव्दारे रेशीम शेतीचे महत्व व अल्प पाण्यावर नगदी पीक असल्यने वर्षातुन ४ ते ५ पीके निघत असल्यने तसेच इतर पारंपारिक पिकापेक्षा जास्त उत्पन्न निघत असल्याचे शेतकरी वर्गात जनजागृती करुन करुन नोंदणी करण्यात येते. नोंदणी केलेल्या अल्पभुधारक शेतक-यांना मनरेगा अंतर्गत ४,८,०००/- १०० टक्के अनुदान देण्यात येते. जे लाभार्थी मनरेगा अंतर्गत नाहीत बहूभुधारक



यांना विभागाकडून सिल्क समग्र योजने अंतर्गत देण्यात येते. राज्यात बीड जिल्हा रेशीम उत्पादनात प्रथम क्रमांकावर आहे जिल्हयात ५४०६ शेतकरी यामध्ये काम करत असून रेशीम उत्पादनामुळे उसतोड कामगार म्हणून ओळख असलेल्या या जिल्हयाची ओळख रेशीम उत्पादक जिल्हा म्हणून होत आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत विभागाकडून शासनमान्य कोष खोली बाजारपेठ उभारणी केली असून यामध्ये मोठया प्रमाणात कोष खरेदी (राज्यात प्रथम क्रमांकावर) केले जात आहे.

सन २०२३-२४ मध्ये ११०९ मेट्रिक टन कोष शेतक-यांनी विक्री केले असून सन २०२४- २०२५ मध्ये १५ डिसेंबर २४ अखेर १०२२ मे. टन कोषाची खरेदी झाली असून सध्या कोषाचे सरासरी दर ५५०-६५० च्या प्रति क्विंटल असल्यने शेतक-यांचा कल रेशीम शेतीत वाढत चालला आहे.

यावेळी रेशीम विकास अधिकारी एस.बी. वराट, ए.एम सोनटक्के, एस.आर. राठोड, एस.व्ही बावणे, एस.आर.पाटील, व्ही. एम मस्के, जी. एम शेळके, डी.बी. मिर्झा तसेच राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त शेतकरी शिवराज काटे, श्री. सपकाळ हे उपस्थित होते. या कालावधीत जास्तीत जास्त शेतक-यांने रेशिम करिता नोंदणी करण्याचे आवाहन रेशीम विकास अधिकारी यांनी केले आहे.

# बीड येथे धनगर समजाचा राज्यस्तरीय वधु-वर परिचय मेळावा ॲड राजु शिंदे

बीड ।प्रतिनिधी

दिनांक १६.१.२०२५ राजे मल्हाराव होळकर सामाजिक प्रतिष्ठाण यांनी धनगर समाजाचा राज्यस्तरीय वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन १६ मार्च २०२५ रविवार रोजी ११. वा. भगवान प्रतिष्ठाण बार्शी रोड बीड तालुका जिल्हा बीड येथे आयोजन करण्यात आलेले आहे.



आजच्या धकाधकीच्या जीवनात पालकांना पाल्यांचे विवाह जुळविणे दुरापास्त होत आहे. यामुळे आपल्या पाल्यांना योग्य जोडीदार मिळणे कठीण होत आहे. यासाठी मुलां-मुलींला योग्य जोडीदार मिळण्यासाठी पालकांनी आपल्या डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, प्राध्यापक वकील व शेतकरी मुला मुलींचे व अन्य क्षेत्रातील नोकर व गरजु मुलां-मुलींचा बायोडाटा दि.२८/०२/२०२५ पर्यंत महाराष्ट्रातून मुला मुलींचा बायोडाटा पोस्टाने किंवा प्रत्यक्ष किंवा व्हाट्सअप नंबर वर पाठवण्यासाठी आवाहन युवा मल्हार सेना संस्थापक सचिव ड राजु रामभाऊ शिंदे यांनी अंकुशराव येळे ९८९०९०७२६१, प्रा.भगवान माने ७०२००१४१४६, ॲड.राजु शिंदे ९४२२७०२८४३, प्रा.राजेंद्र गाडेकर ७०२०९७७१००, प्रा.भास्कर चादर ९४२०३८९०१४, आण्णासाहेब मतकर ७७९८०९०८१६,तानाजी लासुने सर ९८६०२२५३३८, धवण सर, विशाल देवकते ९८९०६३६३९५, रामदास निर्मळ महाराज ९०४९५९३२५२, प्राध्यापक रेखाताई निर्मळ , संगीतताताई मस्के, संतोष वाघमोडे,या नंबरवर व्हॉटॲपद्वारे पाठवावे असे आवाहन राजे मल्हाराव होळकर सामजिक प्रतिष्ठाणचे कार्याध्यक्ष ड राजु शिंदे यांनी केले आहे.

# तुलसी महाविद्यालयात 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' विविध उपक्रमांनी साजरा

**बीड ।प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्याची राजभाषा असलेलया मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन व्हावे याकरिता दि. १४ जानेवारी ते दि. २८ जानेवारी या कालावधित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या पंधरवड्याचे औचित्य साधून महाविद्यालयातील मराठी विभागतर्फे विविध उपक्रम योजित करण्यात आले होते.**



कार्यक्रमाचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी व्यासपीठावर प्रसिद्ध लेखक, कथाकार प्रा.सुरज उखाडे, तुलसी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.प्रकाश ढोकणे, वादक, गायक, संगीतकार प्रा.राजेश इंगोले, मराठी विभाग प्रमुख प्रा.मगन ओव्हाळ, प्रा.हनुमंत विद्यागर आदी उपस्थित होते.

दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी कथाकथन, काव्यवाचन, कवितालेखन आणि गीतगायन अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत महाविद्यालयातील अनक विद्यार्थीनी सहभाग घेतला होता. यावेळी प्रा.हनुमंत विद्यागर यांनी मराठी भाषेचे संवर्धन व महती याविषयीची माहिती सांगितली.सूत्रसंचालन बीसीए चा विद्यार्थी आदित्य ठोंबरे यांनी केले तर आभार मराठी विभागप्रमुख प्रा.मगन ओव्हाळ यांनी मानले. सदर कार्यक्रमाला प्राध्यापक

# बालपणीच वाचनाची गोडी लागावी म्हणून पालकांनी विद्यार्थ्यांच्या हाती चांगली पुस्तके देणे हिताचे - माया दिवाण

## महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल तर्फे वाचन संकल्प पंधरवडा संपन्न

बीड ।प्रतिनिधी

शिक्षणाने माणसाचे मस्तक सशक्त होते व सशक्तमस्तक कोणा पुढेही नतमस्तक होत नाही. त्याकरिता पालकांनी आपल्या पाल्यास बालपणीच वाचनाची चांगली पुस्तके दिली पाहिजेत. विद्यार्थ्यांनी देखील आपले ध्येय निश्चित करून अभ्यासातील सातत्य, गुरुजनांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेऊन आपल्या आई-वडिलांच्या कष्टाची जाण ठेवून आपल्या ध्येयपूर्ती कडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणे १८, १८ तास वाचन करून वाटचाल करावी असे प्रतिपादन माया दिवाण यांनी केले. वाचन संकल्प महाराष्ट्राचा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनाचे औचित्य साधून महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाने बलभीम नगर पालवन रोड बुद्ध विहार येथे आयोजित केलेल्या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख वक्त्या म्हणून माया दिवाण उपस्थित होत्या तर कार्यक्रमाचे अध्यक्षपदी सेवानिवृत्त केंद्रप्रमुख ए.एल.अवसरमोल लाभले होते. महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले, प्रा.डॉ. शिवाजीराव दिवाण , कॅप्टन राजाभाऊ आठवले, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत वासनिक, प्रा.अशोक गायकवाड, यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक अँड.तेजस वडमारे यांनी तर सूत्रसंचालन डी.एम.राऊत यांनी केले. ह्याप्रसंगी महामानव अभिवादन ग्रुप तर्फे महापरिनिर्वाण दिनी मिळालेल्या दानातून २८ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शालेय साहित्य (वही पेन)वाटप केले. तर अतिउच्च शिक्षणाच्या जोरावर भारताचा घटनाकार झाला माझा भीमराव हे सुरेल गीत तनिष्का वाघमारे यांनी गाऊन सर्वांना मंत्रमुग्ध केले. तसेच वैभवी कांबळे, आरोही वाघमारे,आदिती धनवे, सोहम जोगदंड, संजय धनवे, आदिरा वाडमारे या विद्यार्थ्यांनी सुरेल गीत व वाचनाचे महत्त्व यावर उत्कृष्ट भाषण केले. त्याबद्दल वाचाल तर वाचाल फिरते वाचवला तर्फे महापुरुषांच्या जीवन चरित्राची पुस्तके भेट देऊन सन्मानित करण्यात आले. तर प्रा. अशोक गायकवाड यांनी या विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ रोखबक्षेसे दिली. वाचन संस्कृतीकडे विद्यार्थी आकर्षित व्हावेत म्हणून वाचनालयाने स्थापन केलेल्या ३८ व्या केंद्रातील तिसऱ्या फेरीतील ५० पुस्तकांचा संच मोफत वाचनाला तर्फे अध्यक्ष डी.जी. वानखेडे यांनी मान्यवरांच्या हस्ते अँड.तेजस वडमारे त्यांना सुपूर्त केला. ह्या पुस्तकाचा पालकांनी व विद्यार्थ्यांनी पुरेपूर लाभ घ्यावा असे असे आवाहन वाचनालया तर्फे करण्यात आले. बलभीम नगर परिसरातील जेष्ठ महिला जयश्री वडमारे, आशाताई डोळस,मालनताई अंनकुटे,रमाबाई सोनवणे,व नंदाताई वडमारे यांनी आपल्या मुला मुलींना काबाडकष्टाची पर्वा न करता उच्च शिक्षण दिले. त्यांचा राष्ट्रमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, महाराणी येशूराणी, महाराणी ताराराणी, व माता रमाई यांच्या जीवनचरित्राची पुस्तके देऊन गौरविण्यात आले. शिक्षणा शिवाय पर्याय नाही, हे अनेक उदाहरणाद्वारे




अत्यंत सोप्या भाषेत प्रज्ञा सूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रंथ प्रेम व त्यातून विद्येच्या जोरावर एका पेनची काय शक्ती असते हे स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायावर आधारित जगातील सर्वोत्कृष्ट संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर कसे झाले हे समजावून सांगितले. आपल्या मनोगतात वासनिक यांनी विद्यापीठ लढायावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन के. एस. वाघमारे यांनी मानले. कार्यक्रमास सिद्धार्थ विद्यागर, वाघमारे (सिक्युरिटी) अंकुश जाधव, आचल वडमारे, अंजली वडमारे, किरण वडमारे, दिपाली जाधव, सरिता खेमाडे व परिसरातील बहुसंख्या पालकांची उपस्थिती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा नामविस्तार आंदोलनातील शहिदांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करून सरनातयेने कार्यक्रमाची सांगता झाली.

### पान १ वरून...

**देशमुखांच्या मारेकऱ्यांना...**

फासणारी घटना आहे.या प्रकरणाची व्याप्ती मोठी आहे.संतोष देशमुख यांचे अपहरण करताना स्विफ्ट गाडी कोणाची होती? मारेकऱ्यांना राहायला कोणी घरं दिली ? या सगळ्या गोष्टी तपासात स्पष्ट होतील.खंडणी मधील जे आरोपी होते ते कोणाच्या घरात होते ? त्यांना कोणी गाड्या पुरवल्या?हे सगळं समोर येईल.परळी बाहेरचा विषय खूप मोठा आहे. केजमध्ये गुंडांची प्रवृत्ती झालीय.इतर आरोपींना सुद्धा मकोका लावला पाहिजे ही आमचीमागणी आहे.हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टमध्ये चालवायला हवे.डव्होकेट उज्वल निकम जर होकार देत नसतील तर सतीश माने शिंदे या वकील महोदयां ना हे प्रकरण द्या,असेही खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले.

जमावबंदी असताना आंदोलन कसे?

बीडमध्ये दि.१४ रोजी रात्री वाजेपासून जमाव बंदी आदेश लागूकरण्यात आले होते.असे असताना ही परळीत आंदोलन कसे झाले? हिंदू सणाच्या दिवशी गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी परळी बंद करण्याचा निर्णय घेतला. या प्रकरणी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून त्यांना सगळा वृत्तांत देणार आहे.

मुंडेच्या राजीनाम्याचा प्रश्न सरकारचा.

गुन्हेगाराला कुठलीही जात नसते.काही मूठभर समाजकंटक आहेत, ज्यांना जातीय रंग द्यायचा आहे.अजित पवारांनी बीडमध्ये पक्षाची कारवाई करताना थोडा उशीर केला का काय असं वाटतंय.संतोष देशमुख हत्येच्या संदर्भात जे-जे आहेत,जे कोणी सामील असेल या सर्वांना फाशी झाली पाहिजे.मी मागितला तर धनंजय मुंडे राजीनामा देणार आहेत का? तो सरकारचा प्रश्न आहे ते बघतील असेही खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे.

**मा.मुख्यमंत्र्यांनी ..**

आहे. पालकमंत्री हे जिल्ह्यातील सर्व मतदारसंघांना समान न्याय देत नाहीत. निधी वितरणामध्ये भेदभाव केला जातो. म्हणून समतोल विकासाला खीळ बसते. लोकनियुक्त लोकप्रतिनिधींना बाजूला ठेवून निधी वितरीत केला जातो, हेच मुळात लोकशाहीला मारक आहे. राज्यस्तरीय विभाग निहाय मंत्री समिती किंवा मंत्रीगट स्थापन करून जिल्ह्या जिल्ह्याचे नियोजन त्या त्या समिती किंवा मंत्रीगटावर टाकले तर ही एकाधिकारशाही आणि अनागोंदी कमी होऊ शकेल. मंत्रीगटामध्ये किंवा मंत्री समितीमध्ये किती मंत्री असावेत हे मा. मुख्यमंत्री यांचा अधिकार आहे. असे केले तर नक्कीच

### पान १ वरून...

जे जागोजागी टक्केवारीचे ठेले उभे केलेले आहेत ते बंद होतील आणि जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल असे प्रा.सुरेश नवले यांनी म्हटले.

**हरवलेल्या मुलीचा...**

निवेदनात मागणी करण्यात आली की सर्वतोपरी उपाययोजना करून लवकरात लवकर सदर मुलीचा शोध लावण्यात यावा. तसेच शहरात पुन्हा भविष्यात अशा घटना घडू नये म्हणून प्रशासनाच्या वतीने शहरातील मोहल्ल्यांच्या व कॉलोनीच्या प्रवेश मार्गावर तसेच शहरातील मुख्य चौकात व शाळा आणि महाविद्यालयांच्या मार्गावर सिसि टीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. शहरात पुन्हा अशा घटना घडू नये यासाठी खबरदारी म्हणून विविध उपाययोजना करण्यात याव्यात.

याप्रसंगी महिला शाखेच्या अध्यक्ष ख़िज़र जमानी, उपाध्यक्ष तबस्सूम जबिन, जी आय ओ अध्यक्ष सारा फिरदौस, जी आय ओ सचिव आफिया जिलानी, फरीदा अज़िम, खान शबाना तसेच जमात ए इस्लामी हिंद अंबडचे अध्यक्ष सादेख मजाहिरी, सलीम खान, आबेद क़ाज़ी इत्यादी उपस्थित होते.

**आ.संदीप क्षीरसागरांची ..**

आणि समस्यांचे निराकरण करावे. असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी तहसिलदार, गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी यांना दिले होते. यावर आता तहसिलदार यांनी आदेश काढले आहेत. दि.२२ जानेवारी ते ३१ जानेवारी या काळात बीड तालुक्यातील प्रत्येक गावात असे शिबीर घेण्यात येणार आहेत. दरम्यान आ.संदीप क्षीरसागरांच्या या नाविन्यपूर्ण संकल्पनेचा फायदा ग्रामीण भागातील लोकांना मोठ्या प्रमाणात होणार आहे.

**पाटोदा गावात..**

बबनराव लोणीकरच धावून येतात अशी चर्चा आता पाटोदा गावातील घराघरात सुरू आहे.

अंकुशराव बोराडे, पंजाबराव बोराडे, गणेशराव चव्हाळ, दिगंबरराव बोराडे अशोकराव बोराडे या गावातील मान्यवरांनी आमदार बबनराव लोणीकर यांना पाटोदा गावात पिसाळलेल्या वानराने हैदोस माजवला गावातील महिला पुरुष लहान मुले भयभीत झाले आहेत आतापर्यंत या पिसाळलेल्या वानराने गावातील विठ्ठल डोळझाके, बबन डोळझाके यांच्यासह एकूण सहा लोकांना चावा घेतला तर काही लोकांवर हल्ला केला असल्याची माहिती देखील लोणीकर यांना

### पान १ वरून...

देण्यात आली. त्या आधारे आमदार बबनराव लोणीकर यांनी तात्काळ वन विभागाचे अधिकारी श्री दौंड यांना संबंधित प्रकाराची माहिती देत तात्काळ उपयोजना करण्याच्या सूचना दिल्या त्यानुसार वन्य प्राण्यांचा अटकाव करण्यासाठी आवश्यक असणारे साहित्य व पिंजरा जालना जिल्ह्याकडे उपलब्ध नसल्यामुळे आमदार बबनराव लोणीकर यांच्या सूचनेनुसार छत्रपती संभाजीनगर येथून सर्व साहित्य मागवण्यात आले व आज त्या पिसाळलेला वानराला बंदिस्त करण्यात आल.

मंठा तालुक्यातील उस्वद परिसरामध्ये बिबट्या दिसला असून परिसरातील नागरिक भयभीत आहेत याबाबतीत सुद्धा आमदार बबनराव लोणीकर यांनी वन अधिकाऱ्यांना सूचना केली असून लवकरात लवकर त्याचे बंदोबस्त करण्यासंदर्भात आदेश दिले आहेत या ठिकाणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली आहेत असे असले तरी केवळ मतांचे राजकारण न करता आमदार बबनराव लोणीकर यांनी तातडीने वन अधिकाऱ्यांना सूचना केली त्याचप्रमाणे वन अधिकाऱ्यांना आवश्यक असणारे पिंजरा व इतर सर्व साहित्य मिळवून देण्यासाठी तात्काळ जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ यांच्याशी चर्चा करून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात मदत करतो असा शब्दही आमदार बबनराव लोणीकर यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिला.

परतुर शहराचा पाणीपुरवठा मागील अनेक दिवसांपासून बंद आहे परंतु ज्या लोकप्रतिनिधींना परतूर शहरांमध्ये मताधिक्य मिळाले त्यांना याची साधी कल्पना सुद्धा नाही भाजपा शहराध्यक्ष प्रवीण सातोनकर माजी उपनगराध्यक्ष संदीप बाहेकर प्रकाश चव्हाण नगरसेवक कृष्ण आरगडे दिनेश कुमार होलानी यांनी आमदार लोणीकरांशी संपर्क करून नगरपरिषदेने विज बिल न भरल्यामुळे पाणीपुरवठा खंडित करण्यात आला असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. लोणीकरांनी तात्काळ परतूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी व वीज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता श्री मठपती या दोघांशी चर्चा करून तात्काळ पाणीपुरवठा सुरळीत करण्यासंदर्भात सूचना केले. उद्यापर्यंत पाणीपुरवठा सुरळीत होईल असा विश्वास आमदार लोणीकरांनी व्यक्त केला आहे

कोणत्या गावात किती मते मिळाली हे महत्त्वाचे नाही, त्या गावातील समस्या सोडवणे माझे कर्तव्य - लोणीकर

मी एक लोकप्रतिनिधी आहे ४० वर्ष सर्वसामान्य लोकांमध्ये काम करत आहेत अशा परिस्थितीत जनसामान्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी तुम्ही कायम पुढाकार घेतला आहे.

# सिडबी कडून स्टार्ट अपसाठी दोनशे कोटी रुपयांची तरतूद प्रत्येक प्रादेशिक विभागाला तीस कोटी रुपयांची तरतूद

## नवीन स्टार्ट अप धोरण देशातील आधुनिक धोरण ठरणार
## राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करणार
## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राष्ट्रीय स्टार्ट दिवस कार्यक्रमात घोषणा

मुंबई ।प्रतिनिधी

सिडबी स्मॉल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया) कडून स्टार्ट अपसाठी दोनशे कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक प्रादेशिक विभागाला तीस कोटी रुपयांची तरतूद करणार आहे. काळाची गरज ओळखून स्टार्ट अप धोरणाचा नवीन मसुदा तयार केला आहे. उद्योजकांना सूचनांसाठी हा मसुदा उपलब्ध करून देण्यात आला आहे हे देशातील आधुनिक धोरण ठरणार तसेच राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राज्य नाविन्यता सोसायटीच्यावतीने एम्पॉवरींग इनोव्हेशन, एलिव्हेटिंग महाराष्ट्र या संकल्पनेवर आधारित 'राष्ट्रीय स्टार्टअप दिवस' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. ऐ आय (-ख) तंत्रज्ञानाच्या यावेळी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दीप प्रज्वलन मुख्यमंत्री यांनी केले.

यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, आयुक्त प्रदीपकुमार डांगे, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सुर्यवंशी, मेरीको लिमिटेडचे अध्यक्ष हर्ष मारीवाला, अपग्रेड अँड स्वदेस फाउंडेशनचे सह संस्थापक रॉनी स्क्रूवाला, नायकाच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी फाल्गुनी नायर यासह ,स्ट्राइड व्हेंचर्स आणि स्ट्राइडवनचे संस्थापक इशप्रीत सिंग गांधी, आयआयटीचे माजी विद्यार्थी कल्याण चक्रवर्ती, गो इंडिया च्या व्यवस्थापकीय संचालक इप्सिता दासगुप्ता, महाराष्ट्रासह देशभरातील तंत्रज्ञान, कृषी, सेवा क्षेत्र, औषधनिर्माण तसेच पर्यटन अशा विविध क्षेत्रांतील १००० स्टार्टअप या कार्यक्रमात उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, नवं उद्योजक आणि महिला उद्योजकांच्या नवकल्पना सक्षम करून महाराष्ट्राची उन्नती करण्यात येणार आहे. देशात स्टार्टअप सुरू झाले तेव्हा ४७१ स्टार्ट अप होते आज देशात एक लाख ५७ हजार आहेत. राष्ट्रीय स्टार्टअप दिनानिमित्त मला अभिमानाने सांगावेसे वाटते की महाराष्ट्र केवळ भारताच्या स्टार्टअप क्रांतीत सहभागी नाही तर त्याचे नेतृत्व करत आहे. राज्यात २६ ००० स्टार्ट अप आहेत. आपण असे अभियान राबवित आहोत की ज्यामध्ये महिला स्टार्टअप मध्ये सर्व पदांवर असतील. देशात जास्त महिला डायरेक्टर असलेले महाराष्ट्र हे पहिलं राज्य आहे. स्टार्टअपमध्ये महाराष्ट्र पहिल्या सात राज्यात आहे असेही ते म्हणाले.



मुख्यमंत्री म्हणाले की, उद्योजक, दूरदर्शी गुंतवणूकदार, धोरणकर्ते, इन्क्युबेटर्स, विद्यापीठे हे उद्योग क्षेत्रातील बदलाचे प्रणेते आहेत. इज ऑफ डूईंग बिझनेसमुळे उद्योग कमी वेळात सुरू करण्यामध्ये पारदर्शकता आली आहे. गुंतवणुकीत महाराष्ट्र राज्य हे देशात पहिले आहे. भविष्यातही मानवी हस्तक्षेप न ठेवता पारदर्शक पद्धतीने उद्योजकांना राज्यात शासना बरोबर उद्योग सुरू करण्याची संधी प्राप्त करून दिली जाणार आहे. उद्योग सुरू करताना मुंबई पुणे मध्ये पोषक वातावरण आहे. मुंबई निधीमध्ये आघाडीवर असून, पुणे तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचे केंद्र आहे. आपली टियर-२ आणि टियर-३ शहरे महाराष्ट्राच्या विकासात मोठा हातभार लावत आहेत. नाशिक, नागपूर, औरंगाबाद आणि कोल्हापूर ही शहरे स्टार्टअप्सना प्रोत्साहन देत आहेत आणि इकोसिस्टम निर्माण करतात असेही ते म्हणाले.

विद्यापीठे आणि इन्क्युबेटर्स महाराष्ट्राच्या नवकल्पना स्टार्टअपला बळकटीकरण देणाऱ्या संस्था आहेत. ग्रामीण भागातील नव कल्पना असलेल्या तरुणांनाचा उद्योगात सहभाग वाढवणार असून, उद्योजकांना मार्गदर्शन, नेटवर्किंग, कायदेशीर सहाय्य इत्यादी सेवा देणार्य इन्क्युबेटर्सना स्टार्टअप सुरू करण्यासाठी सहकार्य करणार. शासकीय आणि खाजगी विद्यापीठे या भविष्यातील स्टार्ट अपला बळकटीकरण देणाऱ्या संस्था आहेत. विद्यापीठे आणि इन्क्युबेटर्स हे नोकरी शोधणारे नव्हे तर नोकरी निर्माण करणारे बनवणार असेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.

ए आय स्टार्टअपचे सक्षमीकरण करून उत्कृष्ट तेचे केंद्र बनतील. ए आय हे तंत्रज्ञानातील भविष्य आहे. ए आय तंत्रज्ञान हे स्टार्टअपसाठी मोठे योगदान देणारे ठरणार आहे. यामुळे केवळ उद्योगाच्या संधी नाहीतर रोजगाराच्या संधीही निर्माण होणार आहेत. राज्याला स्टार्टअपमध्ये आघाडीवर आणण्यासाठी राज्य शासनासोबत काम करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री यांनी उपस्थित उद्योजकांना केले.

महाराष्ट्र स्टार्टअप ची राजधानी बनणार: मंत्री मंगलप्रभात लोढा

कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशात कौशल्य विकास विभागात सुरू करण्यात आला तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात कौशल्य विकास विभागाला गती दिली आहे. राज्यातील स्टार्टअप ला जगात पुढे नेण्यासाठी मुख्यमंत्री प्रयत्नशील आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे जगात भारत देशाला एक नंबर बनवण्यासाठी सर्वांचे प्रयत्न आवश्यक आहेत. सर्व स्टार्टअप देशाला पुढे नेण्यासाठी नक्कीच प्रयत्न करतील अशी त्यांनी अशा व्यक्त केली.

सर्वाधिक महिला स्टार्टअप असलेले महाराष्ट्र राज्य : फाल्गुनी नायर

नायकाच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी फाल्गुनी नायर म्हणाल्या की, महिलांनी उद्योगात आघाडीवर येण्यासाठी शासकीय नियमांचे कोणतेही अडथळे नाहीत. उद्योगांच्या अनेक संधी शासनामार्फत उपलब्ध आहेत. मुंबईसह महाराष्ट्रात महिला सुरक्षित असल्याने महिलांचे सक्षमीकरण होत आहे. महाराष्ट्र हे स्टार्टअप कॅपिटल असून त्याचा राज्यातील महिलांना नक्की लाभ घ्यावा. राज्यात सर्वाधिक महिला स्टार्टअप असलेले महाराष्ट्र हे राज्य आहे.

सिडबी स्मॉल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया) कडून स्टार्ट अपसाठी दोनशे कोटी रुपयांची तरतूद चा सामंजस्य करार करण्यात आला. डिजिटल मीडिया सेंटर ऑफ एक्सलन्स आयटीआय गोवंडी चे मुख्यमंत्री यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणाली द्वारे उद्घाटन झाले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्टार्ट अप विजेत्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील यांनी आभार मानले.

कौशल्य विकास सोसायटीचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सोनवणे, राज्य नाविन्यता सोसायटी चे सह मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विकास नाईक, व्यवस्थापक अमित कोठावडे यावेळी उपस्थित होते.

सूत्रसंचालन अवाना दुबाश, राखी तांबट यांनी केले.

---

# बीड तालुका पतसंस्था फेडरेशनची निवडणूक बिनविरोध

## अध्यक्षपदी कल्याण आखाडे तर उपाध्यक्ष म्हणून प्रकाश कवठेकर यांची निवड

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोधपणे पार पडली असून फेडरेशनच्या अध्यक्षपदी कल्याण आखाडे यांची तर उपाध्यक्ष म्हणून प्रकाश कवठेकर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड झाली आहे. बीड तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी सावता नागरी पतसंस्थेच्या मुख्य शाखेत विशेष सर्वसाधारण सभा बोलवण्यात आली होती. या सभेप्रसंगी संचालक मंडळ व अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्या निवडीची प्रक्रिया अतिशय खेळीमेळीच्या




वातावरणामध्ये पार पडली. सन २०२५ ते २०३० या कालावधी करता निवड झालेल्या संचालक मंडळामध्ये श्री.कल्याण आखाडे व श्री.प्रकाश कवठेकर यांच्यासह श्री.लहुराव राऊत, श्री.रविंद्र वाघमारे, श्री.रघुनाथ खरसाडे, श्री.सखाराम शिंदे, सौ.सुवर्णमाला संतराम शिंदे, सौ.शिवकन्या अशोक राऊत, सौ.बालिका संतोष सपकाळ यांचा समावेश आहे. संचालक मंडळाच्या पहिल्या मासिक सभेत रिक्त असलेल्या २ जागांसाठी व स्वीकृत संचालकांच्या २ जागांसाठी निवड करण्यात येणार आहे.

---

# यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे वाचन पंधरवडा संपन्न

बीड ।प्रतिनिधी

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि वाचन संस्कृती वाढविण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने एक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. राज्यभरात १ ते १५ जानेवारी या कालावधीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम दरवर्षी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचाच एक भाग



म्हणून महाविद्यालयाच्या ग्रंथालया मध्ये वाचन पंधरवडा संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या समारोपाच्या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बापूराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांनी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, या उपक्रमाचा उद्देश वाचनाला प्रोत्साहन देऊन वाचन संस्कृती अधिक बळकट करणे हा आहे, आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना पुढे जायचे असेल तर त्याना तंत्रज्ञाना सोबत विविध ग्रंथाचे वाचन ही करावे जेणे करून आपल्या व्यक्तिमत्त्व विकासला चालना मिळेल व आपल्या राष्ट्राची संस्कृती काय आहे हे आपणास माहिती होईल. यात विद्यार्थ्यांनी ही उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. प्रकाश (दादा) सोळंके साहेब, उपाध्यक्ष मा.श्री.अमरसिंह (भैय्यासाहेब) पंडित साहेब, सचिव मा.श्री.सतिश (भाऊ) चव्हाण साहेब, प्राचार्य.डॉ.बापूराव मरलापल्ले यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी महाविद्यालयामधील सर्व विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

---

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावासाठी आंदोलन करावं लागत असेल तर बीड प्रशासन कोणत्या गुर्मीत प्रशासन चालवते – डॉ जितेंद्र ओव्हाळ

बीड ।प्रतिनिधी

काही दिवसात रेल्वे चा कारभार चालू होणार यासाठी रेल्वे स्टेशन उभा केलं याला भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचं नाव देण्यात यावं आशी मागणी बीड जिल्ह्यातील सर्व आंबेडकरी जनतेची आहे या साठी मेजर वीर यांनी आमरण उपोषण चालू केले या पूर्वीही उपोषण आंदोलन करण्यात आले पण बीड प्रशासन रेल्वे स्टेशनला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचं नाव देत नाहीं याचा बीड जिल्हाधिकारी यांनी गांभीर्याने विचार कारण्याची मागणी डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी केली येत्या प्रजासत्ताक दीनापूर्वी रेल्वेस्टेशनचं







वीर यांच्या उपोषणास डॉ ओव्हाळ यांचा पाठिम्बा

नामकरण डॉ बाबासाहेब आंबेडकर असं करा नसता संपूर्ण बीड जिल्यात आंदोलन करण्याचा इशारा डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना दिलेल्या निवेदनात दिला निवासी जिल्हाधिकारी स्वामी यांच्या कडे निवेदन देऊन निर्णय घ्या नसता तीव्र आंदोलन करू असा इशारा डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी दिला या वेळी प्रशांत ओव्हाळ आंबादास सोनवणे राहुल गायकवाड लाला भोले यांच्यासह आंबेडकरी तरुण उपस्थित होते


---

# मुक्रमाबाद येथे आज विरभद्रेश्वरांचा विवाह सोहळा

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथे अती प्राचीन काळापासून चालत आलेली रुढी पंरपरा आज ही आपल्याला मुक्रमाबाद वीरभद्र मंदिरात पाहायला मिळतो. वीरभद्रेश्वर व माते काळम्मा देवी यांचा विवाह व अग्नी कुंड सोहळा प्रती वर्षा प्रमाणे यंदाही दि.१७/०१/२०२५ शुक्रवार रोजी संध्याकाळी ठिक ८.०५ वाजता वीरभद्र मंदिरात करण्यात येणार आहे.

तरी सर्व मुक्रमाबाद व परिसरातील सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित राहून वीरभद्र स्वामीजींचा महाप्रसाद व आशीर्वाद घ्यावा ही विनंती. असे आव्हान मंदिराचे मुख्य पुजारी बस्वराज रेवनअप्पा स्वामी वंटगिरे यांनी केले आहे.



---

# भारत सरकार नोटरी पदी दत्तात्रेय जाधवर

बीड ।प्रतिनिधी

शहरातील प्रसिद्ध वकील दत्तात्रेय सूर्यभान जाधवर यांना नुकतेच भारत सरकारच्या वतीने नोटरी प्रमाणपत्र देण्यात आले आहे. या प्रमाणपत्राच्या आधारे पुढील पाच वर्ष ते नागरिकांची सेवा करणार आहेत. गत दहा वर्षापासून वकिली क्षेत्रात कार्यरत असलेले प्रसिद्ध वकील दत्तात्रेय सूर्यभान जाधवर यांना नुकतेच भारत सरकारच्या वतीने नोटरी प्रमाणपत्र बहाल करण्यात आले आहे. या प्रमाणपत्राचा कालावधी पाच वर्षाचा असून जनतेच्या सेवेसाठी ते कार्यरत राहणार आहेत. दत्तात्रय जाधवर यांना नोटरी प्रमाणपत्र मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून मांग गारुडी समाजाचे जिल्हाध्यक्ष



गोरख काळे, संपादक उत्तम ओव्हाळ, ड . राख, ड. दादासाहेब तांगडे, ड. प्रभाकर आंधळे, ड.पाशा शेख, विजय शिंदे, ड.धम्मा वाघमारे, ड.रवी वाघमारे, ड. मगर, ड. राजन साळवी, ड.शुभम वाघमारे, संतोष ठोंबरे, ड.राम दहिवळ, मारुती ठोंबरे , ड. सोळंके, ड.नागरगोजे, ड.सांगळे सह आदींनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

---

# पुस्तक आणि झाड दिले संक्रातीचे वाण

## तीगावच्या सरपंच अर्चनाताई राज पाटील यांचा सामाजिक उपक्रम

वडवणी ।प्रतिनिधी

लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड राज पाटील हे मागील २५ वर्षापासून सामाजिक क्षेत्रामध्ये नावाजलेले व्यक्तिमत्व आहे. त्यांनी आपल्या गावात एक अनोखी मकर संक्रात साजरी केली. या मकर संक्रातीला गावातील सुमारे ५०० महिलांना त्यांनी संक्रातीचे वाण दिल. या वाणामध्ये केवळ भेटवस्तूच नाही तर तिळगुळा सोबतच पुस्तक आणि एक झाड महिलांना भेट दिली. त्यांच्या या उपक्रमाचे संपूर्ण बीड जिल्ह्यात कौतुक होत आहे.

एडवोकेट राज पाटील हे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे विश्वासू सहकारी आहेत. मराठा आरक्षण लढ्यामध्ये मागील चार वर्षापासून ते जरांगे पाटील यांच्यासोबत काम करत आहेत. लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या माध्यमातून तसेच वडवणी तालुका विकास समिती यासारख्या संघटनेचे नेतृत्व करत असताना मागील पंचवीस वर्षात राज पाटील यांनी सामाजिक क्षेत्रामध्ये खूप मोठे काम केले आहे. निसर्ग आणि मानवता या दोन गोष्टीची सांगड घालून त्यांनी नेहमी वृक्ष संवर्धन आणि वैचारिक देवाण घेऊन यावर भर दिला आहे. त्यांनी आतापर्यंत बीड जिल्ह्या आणि जिल्ह्याबाहेर देखील लाखो झाडांची लागवड केली आहे. आतापर्यंत त्यांनी लाखो लोकांना माता जिजाऊ, छत्रपती शिवराय, छत्रपती संभाजी महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई, माता अहिल्याबाई, माता फातिमा, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, स्वामी विवेकानंद यासारख्या महान व्यक्तींचे



चरित्रांचे पुस्तके वाटलेले आहेत. एवढेच नाही तर संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, तुकडोजी महाराज, गाडगेबाबा यासारख्या संतांचे विचार घराघरात पोहोचविणारे ग्रंथ देखील त्यांनी सांप्रदायिक क्षेत्रामध्ये वाटलेले आहेत. मकर मकर संक्रांतीच्या शुभ सण त्यांनी अनोख्या पद्धतीने साजरा करण्याचा पायंडाच आपल्या गावात पाडला आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी त्यांनी आपल्या गावात मकर संक्रांतीच्या सणाच्या निमित्ताने तिळगुळ आणि भेटवस्तू सोबतच झाडे आणि महापुरुष, संतांचे विचाराचे पुस्तके गावातील मातामावल्यांना वाटले. या संक्रातीच्या निमित्ताने गावातील शांतता सुख समाधान आणि भरभराटी टिकून राहावी आणि एकोपा जर राहिला तर गाव यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास एडवोकेट राज पाटील यांनी व्यक्त केला. त्यांच्या पत्नी सौ. अर्चना राज पाटील विद्यमान सरपंच आहेत आपल्या पतीच्या सामाजिक कार्याला त्यांचा खूप मोठा हातभार आहे. गावाचा विकास आणि निसर्ग संवर्धन हे पतीचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी मेहनत घेत असल्याचे एडवोकेट राज पाटील यांच्या पत्नीं सौ अर्चना पाटील यांनी सांगितले.

गावातल्या प्रत्येक महिलेच्या सन्मानासाठी प्रयत्न करणार

मी तीगावची सरपंच असले तरी गावातील सर्व सामान्य माता माऊल्या माझ्या मार्गदर्शक आहेत. मी सर्व महिलांचा सन्मान करूनच गावाचा कारभार करत आहे. या गावातील प्रत्येक महिलेचे विचार आणि स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी मी प्रयत्न करत आहे. कोणत्याही महिलेला त्याच्या हक्क आणि अधिकारापासून दूर ठेवले जाणार नाही याची काळजी मी घेत आहे. गावातील सर्व महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. प्रत्येक महिलेच्या घराघरात महापुरुषांचे विचार गेले पाहिजेत जिजाऊ, सावित्रीबाई, रमाई, अहिल्याबाई, फातिमा, संत जनाबाई, संत ज्ञानेश्वर, तुकोबाराय यांचे विचार घराघरात पोचविण्यासाठी महिलांना आवश्यक आहे ते सर्व साहित्य मी पुरवणार असल्याचे सरपंच अर्चनाताई राज पाटील यांनी व्यक्त सांगितले.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात राष्ट्रपती पोलीस पदक सन्मानित माजी विद्यार्थी सय्यद रहेमान यांचा सत्कार संपन्न

लातूर ।प्रतिनिधी

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील माजी विद्यार्थी राष्ट्रपती पोलीस पदक सन्मानित सय्यद रहेमान यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी नुकताच सत्कार केला यावेळी कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती. माजी विद्यार्थी सय्यद रहेमान सन १९८१-८२ यावर्षी या कला शाखेमध्ये त्यांनी शिक्षण घेतले असून पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे त्यांनी सहाय्यक पोलीस सब इन्स्पेक्टर म्हणून कार्य केले आहे. त्यांचा सन २०१५ मध्ये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सन्मानचिन्ह देऊन गौरविले. तसेच २०१८ साली त्यांना लातूर भूषण पुरस्कार सुद्धा प्राप्त झाला आहे. सन २०१९ रोजी न्यायमूर्ती श्रीमती रंजना देसाई, सर्वोच्च न्यायालय, नवी



दिल्ली यांच्या हस्ते राष्ट्रीय न्याय गौरव पुरस्कार सुद्धा त्यांना मिळालेला आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्काराने २०२४ मध्ये ते सन्मानित झाले आहे. त्यांनी आतापर्यंत विविध शाळा आणि महाविद्यालयात एन. एस. एस., एन. सि. सी. शिबिरामध्ये व्यक्तिमत्व विकासावर मार्गदर्शन सुद्धा केले आहेत. त्यांच्या या उज्वल परंपरेसाठी त्यांचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला

## जिल्हाधिकारी असंघटित कामगार समिती सदस्यपदी रफिक अब्दुल सय्यद यांची निवड

जालना ।प्रतिनिधी

जालना येथील लोक क्रांती असंघटित कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रफिक अब्दुल सय्यद यांची जिल्हाधिकारी असंघटित कामगार समिती सदस्य पदी निवड करण्यात आली आहे.महाराष्ट्र राज्यात असंघटित क्षेत्रातील कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात असून या क्षेत्रातील



कामगारांचा दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती करीता असलेल्या कल्याणकारी योजना मध्ये समावेश व्हावे व कामगारांना शासनाच्या योजनांची माहिती नसल्यामुळे कामगार लोकांना याचा पासून वंचित राहत असून कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात असल्यामुळे शासकीय योजनांची माहिती सर्व साधारण कामगारांन पर्यंत पोहोचली पाहिजे आणि ग्रामीण भागातील खेड्या पाड्यातील कामगारांना या योजनांचा लाभ मिळावा व कामगारांच्या हिताचे विविध प्रश्न शासन दरबारी मांडण्यासाठी मा.विकास आयुक्त मुंबई यांच्या आदेशानुसार ही समिती जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आली असून या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहे.तसेच शासकीय व अशासकीय सदस्य यांचा ही समिती मध्ये समावेश आहे.जिल्हाधिकारी असंघटित कामगार समिती सदस्य पदी लोक क्रांती असंघटित कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रफिक अब्दुल सय्यद यांची निवड करण्यात आली आहे.

## बीड रेल्वे स्टेशनना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे



वडवणी ।प्रतिनिधी

आज दिनांक १६ /०१/२०२५ गुरुवार रोजी वडवणी तहसील कार्यालयात तहसीलदार साहेब यांना ड गौतमदादा भालेराव मित्र मंडळ बीड जिल्हा , वडवणी तालुका आझाद क्रांती सेना, बहुजन विकास मोर्चा, मानवी हक्क अभियान, वंचित बहुजन आघाडी च्या वतीने मा.तहसिलदार साहेब यांना निवेदन देऊन बीड रेल्वे स्टेशनला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे देण्यात यावे या मागणीसाठी देशाचे जवान मा.अनुरथ सोपानराव वीर हे बीड जिल्हाधिकारी कार्यालय समोर दिनांक ८/०१/२०२५ पासून आमरण उपोषणाला बसले आहेत . डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे अशी त्यांची प्रमुख मागणी असून तरी महाराष्ट्र शासनाने डॉ बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्टेशनला नाव देऊन मंजुरी देण्यात यावे अशी मागणी ड गौतमदादा भालेराव मित्र मंडळ बीड जिल्हा,व सर्व संघटनेच्या वतीने जाहीर पाठिंबा दिला असून या मागणीची प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन बीड रेल्वे स्टेशनला महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे अन्यथा सर्व आंबेडकर चळवळीतील संघटना समाजाच्या वतीने उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल व त्यांची सर्व जबाबदारी शासनाची राहील अशी मागणी केली आहे.यावेळी निवेदन देताना डॉ गौतमदादा भालेराव मित्र मंडळ

# पूर्णवाद व्यायाम शाळेत क्रीडा दिन साजरा

बीड ।प्रतिनिधी

जीवनरथ सारथी डॉ. पारनेरकर महाराज मंदिर ,कोतवाल गल्ली, पूर्णवाद व्यायाम शाळा ,बीड येथे क्रीडा भारती , खछज यांच्यावतीने ऑलिंपिक वीर पैलवान खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त प्रथम ऑलम्पिक वीर पैलवान खशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करून राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात आला .योग, सूर्यनमस्कार क्षेत्रात विभागीय स्तरावर विशेष कामगिरी केल्याबद्दल उपसंचालक शिक्षण व क्रीडा युवक सेवा संचालनालय छ.संभाजीनगर यांच्या वतीने डॉ. डॉ .राजाभाऊ अर्सुळ ,डॉ. संजय तांदळे, डॉ. आनंदकुमार लिमकर,यांच्यासह सर्व खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन



येथोचित सत्कार करण्यात आला.बीडचे वैभव संस्थान श्री गणेश जनार्धन पाटांगणकर महाराज यांच्या परंपरेतील मठाधिपती श्री विनायक महाराज पाटणकर व रामदासी परंपरेतील प्रा. डॉ. कृष्णा रामदासी ,ज्येष्ठ पत्रकार श्री. प्रमोद रावजी कुलकर्णी वेदमूर्ती श्री.विडेकर गुरुजी व जीवनरथ सारथी मंदिराचे संकल्पक , ज्येष्ठ पुनवादी उपाध्यक्ष अशोक काका वजे यांच्या उपस्थितीत मल्लखांब, जिम्नॅस्टिक, योगा प्रात्यक्षिक दाखवण्यात आली. यावेळी पालक विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजक विनायक वझे

# भोकरदन येथिल शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व माजी खासदार यांचे नावाने

## स्वातंत्र्य सेनानी पुंडलिक हरी दानवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भोकरदन, जि. जालना असे नामकरण

जालना ।प्रतिनिधी

राज्य शासनाने १५ जानेवारी २०२५ रोजी कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्यामार्फत शासन निर्णय काढत राज्यातील १३२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे नाव बदलण्यास मान्यता देण्यात आली. यामध्ये भोकरदन येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय, खढख कॉलेज) ला राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व तथा थोर स्वातंत्र्य सेनानी पुंडलिक हरि दानवे यांचे नाव देण्यात आले.

राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंतर्गत शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत या संस्थांमध्ये प्रशिक्षण देण्यात येते. अशा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा मुख्य उद्देश हा युवकांना रोजगारभिमुख प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी सक्षम बनवणे व खाजगी औद्योगिक



आस्थापनांना लागणाऱ्या कुशल मनुष्यबळांचा पुरवठा करणे असा असून या महत्त्वपूर्ण औद्योगिक प्रशिक्षण संस्था (खढख कॉलेज) ला स्वातंत्र्य सेनानी माजी खासदार पुंडलिक हरी दानवे यांचे नाव देऊन एकप्रकारे त्यांचा सन्मान केला आहे.

स्वातंत्र्य मिळविण्यासाठी मराठवाड्याला हैद्राबादच्या निजामशाही विरोधात दीर्घकाळ लढा द्यावा लागला . मराठवाडा मुक्ती संग्रामचे हे आंदोलन सतत १३ महिने सुरु होते. या आंदोलनात अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. अखेर १७ सप्टेंबर, १९४८ रोजी निजामाच्या जोखडातून मराठवाडा मुक्त होवून भारतीय संघ राज्यात विलीन झाला. या मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्यामध्ये स्वातंत्र्य सैनिक पुंडलिक हरी दानवे यांचे योगदान महत्वाचे आहे. स्वातंत्र्य सेनानी पुंडलिक हरी दानवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोकरदन या नावामुळे त्यांचा व त्यांच्या मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्यातील कार्याचा नेहमीच सन्मान करण्यात येईल.

# सिग्नल मध्ये बिघाड करुन लूटमार करणारी टोळी गजाआड

## रेल्वे पोलिसांची दमदार कामगिरी

परळी (प्रतिनिधी)

रेल्वे मार्गावर विविध ठिकाणी सिग्नल बंद पाडून रेल्वेत घुसून दरोड्याच्या घटनांमध्ये आवश्यक असलेल्या सराईत गुन्हेगारांना पकडण्यात परळी रेल्वे पोलिसांना यश मिळाले आहे. सराईत असलेल्या तीन दरोडेखोरांसह भूम येथील एका सराफा व्यापाऱ्यालाही पोलिसांनी अटक केली आहे. ऑक्टोबर व नोव्हेंबर मध्ये परळी वैजनाथ रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन व नांदेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक अशा रेल्वेतील दरोडेच्या तीन घटना घडल्या होत्या. या घटनांतील मुद्देमाल व रेल्वेत दरोडे टाकणारी सराईत टोळीच या निमित्ताने पकडण्यात रेल्वे पोलिसांना यश मिळाले आहे.

ऑक्टोबर आणि नो्हेंबर २०२४ या महिन्यांमध्ये परळी रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये सिग्नल मध्ये बिघाड करून दोन दरोडय़ाच्या व काही चोरीच्या घटना घडल्या होत्या. नांदेड रेल्वे पोलिस ठाण्याच्या हद्दीतही अश्याच प्रकारचा गुन्हा घडला होता. त्यामध्ये आरोपी हे रेल्वेमार्गावर सिग्नल तोडून, बंद पाडून (सिग्नल टेम्परिंग) रेल्वे गाडी थांबल्यानंतर रेल्वे डब्यात घुसून ते प्रवाशांची लूटमार करत होते. आरोपींनी सलग हे दोन-तीन गुन्हे केल्यामुळे त्यांना पकडणे हे रेल्वे पोलिसांसमोर आव्हान होते. रेल्वे पोलीस




विभाग छत्रपती संभाजीनगरच्या पोलीस अधीक्षक स्वाती भोर, पोलीस उपअधीक्षक संजय लोहकरे यांनी तपासासाठी पथक नियुक्त केले होते.रेल्वे पोलीसचे एलसीबी पथक व परळी वैजनाथ रेल्वे पोलीस ठाण्याचे एक पथक यांनी समांतर तपास करीत या आरोपींचा शोध घेऊन आरोपींना जेरबंद केले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अविनाश उर्फ ड्रीम काळे, सतीश उर्फ रवि भोसले, अजित सांगळे यांचा समावेश आहे.तर चौथा आरोपी म्हणून भूम जि.धाराशिव येथील सराफा व्यापारी दिगंबर चंद्रकांत धर्माधिकारी यास अगोदरच अटक करण्यात आलेली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत गंभीरराव, परळी रेल्वे पोलीस ठाण्याचे स.पो.नि. सोमनाथ वाघमोडे, पो. हवालदार संजय भेंडेकर, अनंत कांबळे, कोंडीराम सातपुते, नितीन गवळी गजानन टीमकीकर आदींनी ही कामगिरी केली आहे.

# परळीत प्रतिमेची विटंबना झाल्यानंतर पाटोदा येथे घातला दुग्धाभिषेक

पाटोदा (प्रतिनिधी)

मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांना न्याय मिळावा अमानुष हत्याकांडातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी लोकशाही मार्गाने रस्त्यावरील लढाई लढणाऱ्या मराठा आरक्षण योध्दा मनोज जरांगे पाटील आणि सभागृहात लढाई लढणारे आ. सुरेश धस, आ. संदिप क्षीरसागर, आ. जितेंद्र आव्हाड, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि जिल्ह्यात सक्रिय असणारे राजेंद्र मस्के यांच्या प्रतिमेची काल दि.१४ मंगळवार रोजी वाल्मिक कराड यांना पोलीस प्रशासनाने मकोका अंतर्गत गुन्हा दाखल केल्यानंतर परळीतील खुनातील आरोपी वाल्मिक कराड समर्थकांनी गदारोळ करत सार्वजनिक ठिकाणी मनोज जरांगे पाटील, आ. सुरेश धस, आ. संदिप क्षीरसागर, आ. जितेंद्र आव्हाड, अंजली दमानिया यांच्या प्रतिमेची विटंबना केली होती. वास्तविक पाहता

लोकप्रतिनिधींनी स्व. संतोष देशमुख यांना न्याय मिळवण्यासाठी संवैधानिक पद्धतीने सभागृहात व रस्त्यावर आवाज उठवला म्हणुन दि. १५ बुधवार रोजी सकाळी पाटोदा येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथे दुग्धाभिषेक करण्यात आले. तर पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही येथे पाटोदा तालुका भाजपा नेते संभाजीराव येवले, माजी उपसरपंच नारायण बप्पा येवले, ता अ भाजपा भागवत येवले यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज चौकात या सर्व नेत्यांना दुग्धाभिषेक करण्यात आला. तत्पुर्वी आ सुरेश धस, आ संदिप




क्षिरसागर, आ आव्हाड, खा बजरंग सोनवणे, अंजली दमानिया यांच्या प्रतिमेची सवाद्य मिरवणुक काढण्यात आली. याप्रसंगी पाटोदा नगरपंचायत नगराध्यक्षा पती राजु जाधव, श.प. तालुकाध्यक्ष शिवभुषण जाधव, अजित पवार राष्ट्रवादी सह अध्यक्ष गणेश कवडे, बळीराम पोटे,किशोर अडागळे, राष्ट्रीय कॉंग्रेस तालुकाध्यक्ष राहुल जाधव, सय्यद शहाबाज, शिवसेना उबाठा तालुकाध्यक्ष मुकुंद शिंदे तसेच नगरसेवक व सभापती पदाधिकारी कार्यकर्ते तसेच डोंगकिन्ही येथील संभाजीराजे येवले नारायण बप्पा येवले धनंजय येवले, बाबु रायले, आण्णा खिंडकर भा जपा ता अ भागवत येवले अंकुश येवले महादेव येवले, युवराज येवले' बालु कोल्हे, बाळासाहेब आतकरे, प्रकाश मळेकर, राजु म्हस्के प्रकाश चव्हाण, संतोष येवले, गोवर्धन येवले बापु, परमेश्वर सातपुते प्रमोद म्हस्के, प्रशांत येवले (उपसरपंच)' गणेश महाराज बाळासाहेब ना येवले, सुनिल सातपुते, आप्पा मांडवे, नितिन येवले, आकाश मांडवे बाळासाहेब तोटे, शंकर दादा येवले. सह आ सुरेश धस समर्थक बहुसंख्येने उपस्थित होते. सुत्रसंचलन आबाजी इंगळे व मोहन येवले यांनी केले.

# आदर्श इंग्लिश स्कूल,जामखेडच्या वतीने शैक्षणिक सहलीचे यशस्वी आयोजन!

## ऐतिहासिक,धार्मिक,सांस्कृतिक,नैसर्गिक सौंदर्याने परिपूर्ण स्थळांना भेट देत विद्यार्थ्यांनी घेतला अस्मरणीय आनंद!

प्रतिनिधी/ अंबड

शैक्षणिक क्षेत्रात नावाजलेली जामखेड येथील आदर्श इंग्लिश स्कूल संपूर्ण अंबड तालुका व जालना जिल्हा बरोबर संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी नावलौकिक प्राप्त शाळा म्हणून ओळखली जाते. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याबरोबरच, विद्यार्थ्यांना सर्व गुणसंपन्न बनवण्यासाठी विविध उपक्रमाचे वेळोवेळी आयोजन केले जाते.

याचाच भाग म्हणून शैक्षणिक वर्ष २०२४- २५ च्या अनुषंगाने शैक्षणिक सहलीचे यशस्वी आयोजन करत महाराष्ट्रातील ऐतिहासिक,धार्मिक,सांस्कृतिक,नैसर्गिक सौंदर्याने परिपूर्ण स्थळांना भेट देत विद्यार्थ्यांनी अस्मरणीय आनंद घेण्याबरोबर प्रेरणादायी ऊर्जा प्राप्त केली.

कोकणातील डोळ्याचे पारणे फेडणारे नैसर्गिक सौंदर्य न्याहाळत नागवा बीच, आश्चर्यचकित करणारा समुद्रात स्थापित असणारा,शिल्पकलेचा उत्तम नमुना मुरुड जंजिरा किल्ला, ऐतिहासिक व स्फूर्ती स्थान,स्वराज्याची प्रथम राजधानी रायगड किल्ला, प्रति बालाजी, लाखो भक्तजनांचे श्रद्धास्थान श्री शेत्र जेजुरी येथील मार्तंड मल्हार खंडेरायाच्या दर्शन घेत अभूतपूर्व, अलौकिक अनुभूती विद्यार्थ्यांनी घेतली.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून पौष्टिक,लज्जतदार,चविष्ट जेवण व शुद्ध आरो फिल्टर पाणी विद्यार्थ्यांना सहलीच्या संपूर्ण प्रवासात उपलब्ध करून देण्यात आले. आदर्श इंग्लिश स्कूल जामखेडच्या वतीने आयोजित शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऐतिहासिक स्थळांना भेट देत प्रेरणादायी ऊर्जा, आदर्श प्राप्त करण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या सहलीचे उत्कृष्ट नियोजन, जबाबदारी पूर्वक कार्य प्रणाली मुळे सहल विनाविघ्न यशस्वी ठरली. संस्थापक अध्यक्ष डॉ.गंगाधर पांढरे,संस्था सचिव सौ.आशाजी पांढरे यांच्या मार्गदर्शनानुसार प्राचार्य आर.यार वैद्य, मुख्याध्यापिका वैशाली खिलाडे,डॉ. ऋषी गंगाधर पांढरे, सहशिक्षिका वर्षा पंडित, अनुभवी व कुशल बस वाहन चालक मच्छिंद्र पांढरे, तुळजीराम पांढरे, अमित मोहिते,अनिल वैद्य, पायल वैद्य ओम पांढरे अनुभवी धोंडाआजी, गोलू सावंत, रितेश भालेकर यांनी अथक परीक्षण घेत शैक्षणिक सहल यशस्वी करण्यात परिपूर्ण योगदान दिले. जबाबदारी पूर्वक व उत्कृष्ट नियोजन अनुसार शैक्षणिक सहल यशस्वी केल्याबद्दल पालक वर्गाकडून आदर्श इंग्लिश स्कूल जामखेडचे विशेष कौतुक व अभिनंदन केले जात आहे.



हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

# अध्यात्मिक प्रगतीत सुख प्राप्त होते - ह.भ.प. महंत श्रीराम महाराज विडेकर

## विडा येथे साधू शिवराम पुरी पुण्योत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

केज/प्रतिनिधी

संसारिक प्रगती अस्थिर, क्षणभंगुर असून मानवी जीवनाचा सर्वोत्तम लाभ हा अध्यात्मिक प्रगती असून साधकांनी ती मिळवण्याचा प्रयत्न करावा असे प्रतिपादन ह.भ.प.महंत श्रीराम महाराज विडेकर यांनी केले ते विडा येथे परंपरेने चालत आलेल्या श्री तपोनिधी साधू शिवराम पुरी महाराजांच्या पुण्योत्सव सप्ताहाच्या काल्याच्या किर्तन प्रसंगी बोलत होते याप्रसंगी त्यांनी गोकुळीच्या सुखा अंतपार नाही लेखा । बाळकृष्ण नंदाघरी आनंदल्य।। गुढिया तोरणे करती कथा गाती गाणे ।

तुका म्हणे छंदे येणे वेधिले।। या जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या कृष्ण जन्मपर अभंगावर निरूपण केले याप्रसंगी त्यांनी श्रीकृष्णाच्या जन्मा मुळे गोकुळातील सुखाला अंतपार नव्हता,नंदाच्या घरी बाळकृष्ण जन्मल्या मुळे सर्वांना आनंद झाला त्यामुळे त्यांनी गुढ्या तोरणे उभारून बाळकृष्णाचे स्वागत केले व हरि गुण गात होते आणि कृष्णाच्या या बाल लीलांनी सर्वांना मोहित करून टाकलेहोते.यानंतर त्यांनी गोकुळातील बालकृष्णाच्या लीलांचे सविस्तर वर्णन केले त्याच बरोबर कलियुगामध्ये साधू थोर असून या विडा गावी साधूची थोर परंपरा आहे.येथे तपोनिधी साधू शिवरामपुरी महाराजांची इथे संजीवन समाधी असून तिला खूप मोठे अध्यात्मिक महत्व आहे. याच परंपरेतील सद्गुरु नागनाथ महाराज व प.पु रामकृष्ण महाराज यांच्या उपदेशाने अनेकसाधकांचे जीवन सुखकर झाले असून त्यामुळे त्यांच्या जीवनात भौतिक सुखा बरोबरच आध्यात्मिक सुख प्राप्त झाले असे प्रतिपादन केले.या कार्यक्रमाला केज विधानसभेचे ज्येष्ठ नेते नंदकिशोरजी मुंदडा, बाजार समितीचे सदस्य विलास आप्पा जोगदंड, सुनीलमहाराज,पुरुषोत्तम महाराज,गोपीनाथ महाराज,अरुण महाराज कदम,मनोज देव,दादा महाराज मेटे,परमेश्वर महाराज,शिवराममहाराज,दीपक महाराज मेटे, राजाराम महाराज लहुरीकर,लक्ष्मणराव काकडे,ढोकीकर दादा, धैर्यशील देशमुख,सरपंच सुरज



पटाईत,सकाळचे पत्रकार दत्ता देशमुख, प्रा.जगन्नाथ पटाईत, श्रीमंत भोसले,विटेकर महाराज,भागवत वरकड आदी मान्यवर उपस्थित होते.काल्याची महाप्रसाद पंगत श्री.ढोबळे यांची होती या सप्ताहात काकडा भजन,विष्णू सहस्त्रनाम,ज्ञानेश्वरी पारायण,गाथा भजन, प्रवचन,हरिपाठ आणि हरिकीर्तन अशी उपक्रम संपन्न झाले रात्री ठीक आठ ते अकरा यादरम्यान साधू शिवरामपुरीमहाराज यांची भव्य पालखी मिरवणूक झाली पालखी मार्गावर महिलांनी रांगोळ्या काढून पालखी मार्ग सुशोभित केला होता या पालखी मिरवणुकीत अरुण महाराज कदम व पुरुषोत्तम शास्त्री यांच्या गुरुकुलातील शिष्य गणां नी सहभाग घेऊन पावले फुगडी रिंगण आधी खेळ मोठ्या उत्साहात पार पाडले.शेवटी पालखीचे मंदिरात आगमन होऊन आरती आणि प्रसाद वाटप होऊन कार्यक्रमाची सांगता झाली कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी बाबासाहेब पटाईत,दिलीप देशमुख, उद्धव आप्पा,दिलीप भाऊ,बळीराम बप्पा सह सर्व सदभक्त व नागरिकांनी परिश्रम घेतले.



## गव्हर्मेंट पॉलीटेक्निक कॉलेज बीड येथे गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम संपन्न

बीड/प्रतिनिधी

भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड (सेबी) व नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एन एस इ)कडून गव्हर्मेंट पॉलिटेक्निक कॉलेजबीड येथे पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवशीय गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम घेण्यात आला.अलीकडे तरुण वर्गांमध्ये आर्थिक साक्षरता व आर्थिक नियोजनाचा अभाव जाणून येतो.तरुणांचा कल दिवसेंदिवस चैनी वस्तू,मौजमजा,बर्थडे पार्टी अशा गोष्टींकडे होत चालला आहे तसेच फसवणूक करणाऱ्या योजना ज्यामध्ये कमी वेळेत अधिक परतावा देण्याचे अमिष दाखवून विद्यार्थ्यांची फसवणूक करतात यामुळे भविष्यात येणाऱ्या शैक्षणिक तसेच आर्थिक अडचणींनात्यांना सामोरे जावे लागते म्हणून विद्यार्थी दशेमध्ये योग्य ती आर्थिक नियोजन त्यांनी केले तर भविष्यातील येणाऱ्या आर्थिक संकट ते निश्चितपणे टाळू शकतात व आर्थिक दृष्ट्या ते श्रीमंत आणि समृद्ध नागरिक बनू शकतात,या साठीच सेबी तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज एन एस इ चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांना बचत व गुंतवणूक याचे महत्त्व व फरक समजावून सांगितला.आर्थिक नियोजनाचे सात टप्पे समजावून सांगितले तसेच कॅपिटल मार्केट काय असते? म्युच्युअल फंड व त्याचे वेगवेगळे फायदे,एक्सचेंज ट्रेडेड फंड ईटीएफ,गव्हर्नमेंट बॉण्ड इत्यादी बाबत सखोल असे मार्गदर्शन केले या कार्यक्रमास भरपूर संख्येने महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.विद्यार्थ्यांना सेबीची वेबसाईट व सेबीच्या सारथी पचे महत्व सांगून विद्यार्थ्यांना खबरदारीच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी गव्हर्मेंट पॉलीटेक्निक कॉलेजचे प्राचार्य डॉ.मोहन लोहकरे सर यांनी प्रयत्न केले.

# सातव्या एकता मराठी साहित्य संमेलनाचे आज उद्घाटन

## आ.सुरेश धस उद्घाटक तर संमेलनाध्यक्ष प्राचार्या डॉ.दिपाताई क्षीरसागर

मानूर ।प्रतिनिधी

वेदनेला फुंकर माणुसकीची हे ब्रीदवाक्य घेऊन गेल्या दशकापासून एकता फाउंडेशन,शिरूर कासार (महाराष्ट्र राज्य) ही संस्था शैक्षणिक, सांस्कृतिक,सामाजिक,सांस्कृतिक आणि पर्यावरण क्षेत्रात कार्य करत असून गेल्या सात वर्षांपासून राज्यस्तरीय एकता मराठी साहित्य संमेलनांचे ही आयोजन करत आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा तसेच नव्याने लिहिणाऱ्या कवी लेखकांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उदात्त हेतूने प्रेरित होऊन एकता फाउंडेशनच्या सर्वच पदाधिकाऱ्यांसह सभासद आणि कार्यकर्ते उत्साहाने व निर्हेतूकपणे काम करतात.आज दि.१७ रोजी दहिवंडी येथील महात्मा फुले विद्यालयात राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्य नगरीमध्ये संपन्न होणाऱ्या सातव्या एकता मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन माजी मंत्री,आमदार सुरेश आण्णा धस हे करणार आहेत.ह.भ.प.राधाताई महाराज आणि महंत विवेकानंद शास्त्री यांची आशिर्वादपर तर महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ.राजेश गायकवाड आणि माजी सदस्य मा.विलास सिंदगीकर हे विशेष निमंत्रित म्हणून आणि सामाजिक कार्यकर्त्या सुशिलाताई मोराळे यांची विशेष उपस्थिती असणार असल्याची माहिती कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्षा ड.भाग्यश्री ढाकणे,समस्त दहिवंडी ग्रामस्थ आणि एकताच्या पदाधिकाऱ्यांनी माध्यमांना दिली.

तालुक्याचे तहसीलदार,कार्यकारी अभियंता,जिल्हा कृषी अधिकारी,मुख्य कार्यकारी अधिकारी,गटविकास अधिकारी,पोलिस निरीक्षक,तालुका कृषी अधिकारी,गटशिक्षणाधिकारी,यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पद्मश्री शबीर सय्यद यांना जीवन



गौरव,राज्यस्तरीय एकता आदर्श शिक्षक पुरस्कार उषा ढेरे,स्व.भगवानराव चेमटे राज्यस्तरीय एकता सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान, एकलव्य विद्या संकुल, यमगरवाडी,स्व.कमलबाई राजाभाऊ खेडकर राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार सुधारक जाधव (कै.किसनराव जाधव सार्व.वाचनालय, रायमोह). स्व.नाणीबाई शामराव कंधारे राज्यस्तरीय वन्यजीव संवर्धन आणि संगोपन पुरस्कार श्री.व सौ.सृष्टी सिद्धार्थ सोनवणे (सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन प्रकल्प, तागडगाव) जिल्हास्तरीय एकता आदर्श शिक्षक पुरस्कार गोरक्ष नामदेव खेडकर (कें.प्र.तथा केंद्रीय मुख्याध्यापक, कन्या शाळा शिरूर का.जि.बीड यांना वितरित करण्यात येणार आहेत.

लेखक आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत दि.१७ रोजी दुपारी ३ वाजता इ.५ वी च्या पाठ्यपुस्तकातील 'सावरपाडा एक्स्प्रेस-कविता राऊत' या पाठाचे लेखक संतोष साबळे व इ.८ वीच्या पाठ्यपुस्तकातील 'गोधडी' कवितेचे कवी डॉ.कैलास दौंड यांची मुलाखत शालेय विद्यार्थी घेणार आहेत.

# मिशन जरेवाडी कार्यशाळा संपन्न

आष्टी (प्रतिनिधी)

दिनांक १६ जानेवारी २०२५ रोजी पंचायत समिती सभागृह आष्टी येथे मिशन जरेवाडी कार्यशाळा माननीय मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या सूचनेनुसार घेण्यात आली. सदर कार्यशाळेचे उद्घाटन शिंदे साहेब सहाय्यक गट विकास अधिकारी, महाजन साहेब अधीक्षक पंचायत समिती आष्टी, सुधाकर यादव गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती आष्टी व केंद्रप्रमुख त्रिंबक दिंडे, जावेद पठाण, लोंढे बाबासाहेब यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

प्रमुख पाहुण्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन वरिष्ठ केंद्रप्रमुखांच्या हस्ते करण्यात आले. मिशन जरेवाडी या



कार्यशाळेचे सूत्रसंचालन शिंदे बापू विषय साधन व्यक्ती यांनी केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक निंबाळकर बी. यु. यांनी केले. मिशन जरेवाडी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माननीय शिंदे साहेब व माननीय महाजन साहेब यांनी सविस्तर असे उपस्थित मुख्याध्यापकांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणामध्ये माननीय सुधाकर यादव गठशिक्षण अधिकारी आष्टी यांनी मिशन जरेवाडी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाची सविस्तर अशी रूपरेषा उपस्थित मुख्याध्यापकांना, केंद्रप्रमुखांना व शिक्षकांना सांगितले. सर्व विद्यार्थ्यांना मूलभूत भाषिक कौशल्य व पायाभूत संख्याज्ञान प्राप्त होऊन त्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनात त्याचा योग्य प्रकारे वापर करता येईल अशी विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक प्रगती झाली पाहिजे. या कार्यक्रमास एकूण ११० मुख्याध्यापक उपस्थित होते. २० केंद्राचे केंद्रप्रमुख व केंद्रीय मुख्याध्यापक तसेच गटशिक्षण अधिकारी कार्यालयातील भडके आर. एस, जुनेद शेख, माने आर. आर, बागवान एफ. एम, शिरसाट डी. डी., मेरेवार जी. एस. साधन व्यक्ती व यादव एम. सी., निलेश वलवळे, पानसरे हे सर्वजण उपस्थित होते. कार्यक्रमास उपस्थित सर्वांचे आभार भडके आर. एस. यांनी मानले.

## तिळगुळ घ्या,गोड-गोड बोला,राजर्षी शाहु विद्या मंदिरात तिळगुळ कार्यक्रम संपन्न

केज/प्रतिनिधी

स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित राजर्षीशाहू विद्या मंदिर शाळेत मकर संक्रातीचा कार्यक्रमसंपन्न झाला.यावेळी कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी.तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे माजी शिक्षक श्री.डापकर एस.ए.व शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री.यादव व्ही.बी.यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.कार्यक्रम प्रसंगी इयत्ता सहावीतील विद्यार्थीनी कु.स्वप्नाली विजय पाळवदे व कु.प्रतिक्षा ब्रम्हदेव चौरे यांनी मकर संक्रात या सणाबद्दल माहिती सांगितली.शाळेतील शिक्षीका



श्रीमती ध्वजा गायकवाड यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.मंचावर उपस्थित ज्येष्ठ शिक्षक श्री.यादव व्ही.बी.यांनीही सणाबद्दल अधिक माहितीसांगितली. प्रमुख पाहुणे श्री.डापकर एस.ए.यांनी विद्यार्थ्यांना सणाची सखोल माहिती देत सांस्कृतिक व भौगोलिक महत्त्व सांगितले यावेळी ते म्हणाले की, हा एक संक्रमणाचा आणि परिवर्तनाचा दिवस आहे.






# थकबाकी वसुलीसाठी महावितरण आक्रमक

## पंधरा दिवसात ९४८ वीजग्राहकांचा वीजपुरवठा तोडला, ३६० कोटी रूपयांची थकबाकी

बीड ।प्रतिनिधी

जिल्हयातील वीज बिलांच्या थकबाकीचा वाढत जाणारा डोंगर कमी करण्यासाठी महावितरण आक्रमक झाली आहे. विवीध वर्गवारीतील वीजग्राहकांकडे तब्बल ३६० कोटी रूपयांची थकबाकी साचलेली आहे. वसुलीसाठी बडया अधिकाऱ्यांसह इतर कर्मचाऱ्यांचा सहभाग असलेल्या पथकांची नेमणूक करून प्रत्येक थकबाकीदाराच्या दारापर्यंत लाईनमन पोहचत असून वीजग्राहकांनी चालूबिलांसह थकबाकी त्वरीत भरावी अन्यथा नाईलाजास्तव दंडात्मक कारवाई करावी लागेल असे आवाहन बीड मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रेमसिंग राजपूत यांनी केले आहे.



बीड जिल्हयातील थकबाकीदारांची संख्या दिवसें दिवस वाढतच आहे. महावितरणने बील भरण्याचे विविध पर्याय उपलब्ध करून दिले असले तरी वीजग्राहक दरमहा वीजबील भरण्यास टाळाटाळ करीत आहेत. वीजजोडणी दिल्यापासून आजतागायत एकही बील न भरलेले ७३३९ वीजग्राहक असून त्यांच्याकडे ११ कोटी ४८ लाख रूपयांची थकबाकी आहे. तसेच एप्रिल २०२४ पासून वीज देयकाचा भरणा न केलेल्या ग्राहकांची संख्या ६७७२४ असून त्यांच्याकडे १०४ कोटी ३५ लाखांची थकबाकी आहे. तर वीजबील न भरल्यामुळे कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडीत केलेले ग्राहक १लाख २ हजार ९७२ असून त्यांच्याकडे २४३ कोटी ४२ लाख रूपयांची थकबाकी आहे.

थकबाकी वसुलीसाठी लातूर परिमंडल कार्यालयाचे अधिकारी जिल्हयात फिरत असून गेल्या पंधरा दिवसात १३ कोटी ९४ लाख रूपयांचे वीजबील वसूल करण्यात आले असून बील न भरणाऱ्या ४२७ ग्राहकांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी तोडण्यात आला असून ५२१ वीजग्राहकांचा तात्पुरत्या स्वरूपात वीजपुरवठा तोडण्यात आला

# धर्मगुरू डॉ.बाबूसिंग महाराज आमदार,विधान परिषद यांच्या हस्ते

## श्री. अर्जुन चव्हाण यांना राष्ट्रीय गोर बंजारारत्न पुरस्कार २०२५ देऊन गौरव

बीड/प्रतिनिधी

धर्मतपस्वी डॉ.रामराव महाराज राष्ट्रीय बंजारा फेडरेशन भारत या राष्ट्रीय संस्थेच्या वतीने बंजारा समाजातील सामाजिक, शैक्षणिक,सांस्कृतिक, कला,क्रीडा वेगवेगळ्या क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तीला राष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च पुरस्कार राष्ट्रसंत डॉ.रामराव महाराज राष्ट्रीय गोर बंजारा रत्न पुरस्कार देऊन सन्मान केला जातो.श्री.अर्जुन चव्हाण कृषी पर्यवेक्षक शासकीय व रोपवाटिका राजुरी नवगण ता.जि. बीड यांची कृषी क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना नुकताच पद्मश्री कृषीसेवा रत्न पुरस्कार राज्याचे महामंडळ राज्यपाल श्री. सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले होते. या कार्याची दखल घेऊन त्यांची राष्ट्रसंत डॉ.रामराव महाराज राष्ट्रीय गोर बंजारा रत्न पुरस्कार २०२५या पुरस्कारासाठी निवड झाली.नुकताच जगातील बंजारा समाजा ची काशी गोरधर्म पीठ उमरीगड रोड पोहरादेवी या ठिकाणी बंजारा समाजाचे दैवत संत सेवालाल महाराज पोहरागड पिठाचे जागतिक धर्मगुरू डॉ. बाबूसिंग महाराज विधान परिषद सदस्य,महाराष्ट्र राज्य,गोरबंजारा धर्मपिठा चे महंत जितेंद्र महाराज, महंत सुनील महाराज, महंत कबीरदास महाराज व देशातील सर्व महंत यांच्या उपस्थितीत श्री. अर्जुन चव्हाण,कृषी पर्यवेक्षक यांचा सपत्नीक शाल,पुष्पगुच्छ,सन्मान पत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय संस्थेचे प्रमुख श्री.विजय नायक राठोड यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात २९ राज्या मध्ये गोरबंजारा बांधवां च्या प्रगती बाबत माहिती दिली.२०२५ मध्ये २९ राज्यातील २० व्यक्तींना राष्ट्रसंत डॉ.रामराव महाराज राष्ट्रीय गोर बंजारारत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे असेत्यांनी सांगितले बंजारा समाजाचे धर्मगुरू डॉ.बाबुसिंग महाराजयांनी या संस्थेच्या कार्याची प्रशंसा करून देशातील सर्व बंजारा



बांधवांनाएका ठिकाणी जोडण्याचे काम ही संस्था करत आहे असे सांगून वेगवेगळ्या राज्या तून आलेल्या बंजारा समाजातील सर्व वेगवेगळ्या क्षेत्रातील बांधवांना संत सेवालाल महाराज यांच्या कार्याची माहिती दिली.राष्ट्रसंत डॉ.रामराव महाराज राष्ट्रीय गोर बंजारा पुरस्कार मिळालेल्या सर्व सत्कारमूर्तींचे अभिनंदन केले.तसेच श्री.अर्जुन चव्हाण यांनी महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या सेवेत राहून उत्कृष्ट कार्य केले आहे.कृषी व समाजा चे कार्य त्यांच्या हातून कायम होत राहील यासाठी आशीर्वाद दिले. गोरधर्म पिठाचे महंत श्री. जितेंद्र महाराज यांनी भारतातील सर्व गोर बंजारा बांधव एकत्रयेऊन वेगवेगळ्या क्षेत्रातील कार्याबद्दल त्यांचा सन्मान होतो ही बाब समस्त गोर बंजारासाठी कौतुकास्पद आहे.याचा आमच्या महंत व सर्वधर्म गुरूंना अभिमान वाटतो असे सांगितले.वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वच समाजसेवक बांधवांनी समाजाच्या प्रगतीसाठी झटावे असे सांगितले.श्री.अर्जुन चव्हाण यांच्या कृषी क्षेत्रा तील कार्याबद्दल या मिळालेल्यापुरस्कारासाठी बीड जिल्ह्यातून वसंतराव नाईक अधिकारीकर्मचारी संघटनेचे श्री.बाबासाहेब चव्हाण,प्राध्यापक डॉक्टर जगन्नाथ चव्हाण, मुख्याध्यापकश्री.शिवाजी जाधव,कृषी पर्यवेक्षक लहू चव्हाण,माध्यमिक शिक्षक गोरख जाधव, कृषी पर्यवेक्षक राजेंद्र सांगळे,इंजिनीयर अतुल चव्हाण,बंजारा समाजाचे नेते श्री.अंकुश राठोड, प्राचार्य राजेशकुमार राठोड,विमा सल्लागार श्री.राजेश जाधव,परमेश्वर जाधव,सेल्स टॅक्स ऑफिसर राजेंद्र राठोड, वरिष्ठ प्रशासन अधिकारी संजय चव्हाण,लिपिक अविनाश राठोड,युवा नेते कैलास जाधव,वैद्यकीय अधिकारी डॉ.पृथ्वीराज जाधव,संदीप राठोड,सेवा निवृत्त कृषी अधिकारी विष्णू जाधव,चव्हाण व जाधव परिवारातील ज्येष्ठ मार्गदर्शक,गुरुवर्य व कुटुंबातील सर्व सदस्य कार्यक्रम स्थळी यावेळी उपस्थित होते.

# आदित्य पॉलीटेक्निक कॉलेज बीड येथे गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम संपन्न

बीड/प्रतिनिधी

भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड (सेबी) व नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एन एस इ) कडून आदित्य पॉलिटेक्निक कॉलेज बीड येथे पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवशीय गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम घेण्यात आला.अलीकडे तरुण वर्गांमध्ये आर्थिक साक्षरता व आर्थिक नियोजनाचा अभाव दिसुन येतो.तरुणांचा कल दिवसेंदिवस चैनी वस्तू, मौजमजा,बर्थडे पार्टी अशा गोष्टींकडे होत चालला आहे तसेच फसवणूक करणाऱ्या योजना ज्यामध्ये कमी वेळेत अधिक परतावा देण्याचे



अमिष दाखवून विद्यार्थ्यांची फसवणूक करतात यामुळे भविष्यात येणाऱ्या शैक्षणिक तसेच आर्थिक अडचणींनात्यांना सामोरे जावे लागते म्हणून विद्यार्थी दशेमध्ये योग्य ती आर्थिक नियोजन त्यांनी केले.तर भविष्यातील येणाऱ्या आर्थिक संकट ते निश्चितपणे टाळू शकतात व आर्थिक दृष्ट्या ते श्रीमंत आणि समृद्ध नागरिक बनू शकतात, यासाठीच सेबी तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज एन एस इ चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांना बचत व गुंतवणूक याचे महत्त्व व फरक समजावून सांगितला आर्थिक नियोजनाचे सात टप्पे समजावून सांगितले. तसेच कॅपिटल मार्केट काय असते? म्युच्युअल फंड व त्याचे वेगवेगळे फायदे,एक्सचेंज ट्रेडेड फंड ईटीएफ,गव्हर्नमेंट बॉण्ड इत्यादी बाबत सखोल असे मार्गदर्शन केले या कार्यक्रमास मोठ्या संख्येने महा विद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.विद्यार्थ्यांना सेबीची वेबसाईट व सेबी च्या सारथी पचे महत्व सांगून विद्यार्थ्यांना खबरदारीच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी आदित्य पॉलीटेक्निक कॉलेजचे प्राचार्य डॉ.राहुल खडके, एच ओ डी एस आय शेख एस.आय,श्री.श्रीकांत शहाणे,श्री.खालापुरीकर जी.एम.श्री.गडदे सर,श्री. अजय दुधाळ सर,श्रीमती सव्वाशे मॅडम,श्रीमती जाधव मॅडम व इतर प्राध्यापकांनी प्रयत्न केले शेवटी आभार प्रदर्शन

# बाबुरावजी आडसकर महाविद्यालयातील डॉ.काशिद व डॉ.हिरवे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

केज/प्रतिनिधी

केज येथील नगर पंचायत व जन विकास परिवर्तन आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार बाबुरावजी आडसकर महाविद्यालयातील वनस्पती शास्त्र विभागा तील कार्यरत प्राध्यापक डॉ.एन.जी.काशिद व डॉ.बी.जे.हिरवे यांना प्रदान करण्यात आला. नगर पंचायतीच्या प्रांगणात झालेल्या राष्ट्रमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या संयुक्त जयंती सोहळ्यात



शिक्षण,पत्रकारिता, वैद्यकीय शिक्षण,संगीत, महिला बचतगट इत्यादी क्षेत्रात नाविन्यपूर्ण काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देवुन सन्मानीत करण्यात आले.न.प.च्या नगराध्यक्षा सीताताई बनसोड,हारुणभाई इनामदार यांच्या हस्ते डॉ.काशिद व डॉ.हिरवे यांना शिक्षण व संशोधन क्षेत्रातील नाविन्यपूर्ण कामाबद्दल पुरस्कार देवुन सन्मानित करण्यातआले.

त्यांच्या या यशाबद्दल छ. शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव रमेशराव आडसकर,अर्चनाताई आडसकर,प्राचार्य डॉ. एम.जी.फावडे,अधिक्षक पी.एस.भोसले,ग्रंथालय प्रमुख डॉ.आशा बोबडे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या दोघांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.



# मुलांना खेळातून अभ्यासाची सवय लावा – फारुख शेख

**बीड –शालेय वार्षिक क्रीडा स्पर्धा चे आयोजन आझाद हिंद सेमी इंग्लिश उर्दू स्कूल काजीं नगर जालना रोड बीड येथे करण्यात आले होते त्याच्या उदघाटन प्रसंगी महिला व बालविकास अधिकारी बीड श्री फारुख शेख यांनी पालकांना व शिक्षकांना उद्देशून म्हटले की मुलांना खेळाची जास्तीतजास्त संधी उपलब्ध करुण देऊन त्यातून अभ्यासाची सवय आपोआप लागेल. मुलांचा कल पाहून त्याप्रमाणे अभ्यास करुण घ्यावा.**

तसेच मुलामध्ये शिस्त व प्रामाणिकपणा खेळातून वाढत जातो या साठी विविध खेळाचे आयोजन केलेगेले पाहिजे अशी अशा वेक्त केली.

सदर क्रीडा सर्धेचे उदघाटन महिला बालकल्याण अधिकारी फारुख शेख, शिक्षण विस्तार अधिकारी सिद्धेश्वर माटे, सचिव शेख मुसा यांच्या शस्ते करण्यात आले. तीन दिवसात मुलाचे विविध खेळ घेण्यात येणार असून एक दिवस खरी कमाई कार्यक्रम होणार असून लगेचचं स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. उदघाटन प्रसंगी मान्यवरचे शाळेतर्फे सत्कार सिद्दीकी समियोद्दीन, शेख मुद्दाशीर, शेख अय्याज, शेख मुस्तफा, शेख फैसल यांनी केले. संचलन व आभार सय्यद अवेजअली यांनी मानले.

# कामगार नाट्य स्पर्धेत चकवा चांदणंला प्रथम तर चाफा सुगंधीला द्वितीय पारितोषिक

परळी (प्रतिनिधी)

कामगार कल्याण मंडळाच्या ७०व्या कामगार नाट्यस्पर्धेत ललित कला भवन सिडकोचे चकवा चांदणं प्रथम तर कामगार कल्याण भवन लातूरचे चाफा सुगंधी द्वितीय, कामगार कल्याण केंद्र कळंबचे पून्हा पून्हा मोहोंदोजारोला तृतीय, कामगार कल्याण केंद्र निलंगाचे किरवंतला उत्तेजनार्थ प्रथम तर कामगार कल्याण केंद्र चौफाळाचे शापित सेवाला उत्तेजनार्थ द्वितीय पारितोषिक मिळाले.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने कामगार नाट्य स्पर्धेचे आयोजन दरवर्षी केले जाते. हे स्पर्धेचे हे ७० वे वर्ष होते. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण बुधवारी ललित



कला भवन उस्मानपुरा येथे झाले. पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभाग प्रमुख वैशाली बोदेले हे होत्या. तर प्रमुख पाहूणे म्हणून जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाणे, भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश सरचिटणीस मिनाताई मिसाळ, युनायटेड ब्रेव्हरीज लिमि.चे वरीष्ठ मानव संसाधन व्यवस्थापक बिपीन सुपेकर, मराठवाडा विभागाचे सहाय्यक कल्याण आयुक्त भालचंद्र जगदाळे, स्पर्धेचे परीक्षक सुरेखा मसाळ, प्रा. प्रदीप कांबळे, प्रा. कैलास टापरे यांच्या उपस्थितीत झाले. उत्कृष्ट अभिनय पुरुष गटासाठी १३ बक्षीसे, उत्कृष्ट महिला अभिनयसाठी ८ बक्षीसे, उत्कृष्ट दिग्दर्शन ३ बक्षीसे, उत्कृष्ट नेपथ्य ३ बक्षीसे, उत्कृष्ट पार्श्वसंगीतसाठी ३ बक्षीसे, उत्कृष्ट प्रकाश योजनेसाठी ३ बक्षीसे देण्यात आले.सुत्रसंचालन महेश विभांडीक यांनी तर आभार जिज्ञेश पाटील यांनी केले.

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभियानांतर्गत नवगण महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रम

परळी (प्रतिनिधी)

येथील नवगण शिक्षण संस्थेच्या कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांमध्ये आज दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीमध्ये नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार वाचन संकल्प महाराष्ट्राचा हे अभियान राबविण्यात आले असून या अंतर्गत विविध उपक्रम घेण्यात आले. यावेळी एक जानेवारी रोजी वाचन संकल्प महाराष्ट्राचा याचे उद्घाटन करण्यात आले तर तीन जानेवारी रोजी संविधानाचे सामूहिक वाचन करण्यात आले. वाचन संस्कृती विषयी बोलताना प्राचार्य डॉ मधुकर आघाव यांनी सांगितले की इलेक्ट्रॉनिक्स



उपकरणामुळे व सोशल मीडियामुळे वाचन कमी होत आहे वाचन संस्कृती जोपासणे आणि विद्यार्थ्यांच्या हाती पुस्तक देणे हे शिक्षकांचे आद्य कर्तव्य झालेले आहे.कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ एल बी घुमरे, एन एस एस कार्यक्रमाधिकारी डॉ बबन मोहिते, ग्रंथपाल प्रा सुभाष लांडगे , छएझ प्रमुख डॉ अनुरथ चंद्रे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व कर्मचारी बांधवांची उपस्थिती होती यावेळी विविध महत्त्वपूर्ण ग्रंथ व पुस्तके यांची ओळख करून देण्यात आली तसेच ग्रंथालयाची स्वच्छता करण्यात आली.

# संस्कार शाळेतील विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

## एलिमेंट्री परीक्षेत १८, इंटरमिजिएट परीक्षेत १५ विद्यार्थ्यांनी मिळवले घवघवीत यश

परळी (प्रतिनिधी)

शहरातील श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित, संस्कार प्राथमिक शाळेत आज एलिमेंट्री व इंटरमिजिएट स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष कैलास तांदळे प्रमुख पाहुणे म्हणून दीपक तांदळे व पर्यवेक्षक श्री इंगळे सर, ज्येष्ठ शिक्षिका रणखांब मॅडम यांची उपस्थिती होती.


कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व शिक्षणमहर्षी कै. विठ्ठलराव तांदळे सर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य कला शिक्षण बोर्ड तर्फे घेण्यात आलेल्या , चित्रकलेतील एलिमेंट्री परीक्षेत १८ तर इंटरमिजिएट परीक्षेत १५ विद्यार्थ्यांनी यश संपादन केलेले आहे या सर्व विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसमवेत सत्कार व गुणगौरव करण्यात आला. यावेळी दीपक तांदळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले ते म्हणाले, आपणा सर्वांना माहितच आहे की भारत सरकारने शिक्षण क्षेत्रात एक नवीन शैक्षणिक धोरण आणलेले आहे या शैक्षणिक धोरणा अंतर्गत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा मूळ उद्देश आहे. मला अभिमानाने सांगावसं वाटते की संस्कार प्राथमिक शाळा ही सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक व भावनिक विकासासाठी



कार्य करते. . एवढेच नाही तर आपणा सर्वांना माहित आहे हे स्पर्धेचे युग आहे या स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर लहानपणापासूनच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची ओळख व्हायला हवी. त्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलतेचा विकास व्हावा यासाठी प्रत्येक वर्गावर रोज चित्रकलेचा तास असतो. एकंदरीत आमच्या विद्यार्थ्यांचे आयुष्य उज्वल व्हावे व तो आपल्या देशाचा एक आदर्श व सर्व गुणसंपन्न नागरिक बनावा हा आमचा ध्यास आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हेच संस्कार प्राथमिक शाळेचे ध्येय आहे.

# टीम इंडियाचा विजयी चौकार, पाकिस्तानला ५ विकेट्सने लोळवलं

भारतीय दिव्यांग क्रिकेट संघाने टी २० चॅम्पियन्स ट्रॉफीत विजयी चौकार लगावला आहे. टीम इंडियाने विक्रांत केणी याच्या नेतृत्वात कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ५ विकेट्सने धुव्वा उडवला आहे. टीम इंडियाने या विजयासह चॅम्पियन्स ट्रॉफी फायनलमध्ये धडक दिली आहे. पाकिस्तानने टीम इंडियाला विजयासाठी १३९ धावांचं आव्हान दिलं होतं. टीम इंडियाने हे आव्हान ५ विकेट्सच्या मोबदल्यात १२ चेंडूआधी पूर्ण केलं. टीम इंडियाने १८ षटकांमध्ये १४१ धावा केल्या. टीम इंडियाचा हा या स्पर्धेतील पाकिस्तानविरुद्धचा दुसरा विजय ठरला. टीम इंडियाने याआधी



पाकिस्तानला १२ जानेवारीला लोळवलं होतं.

टीम इंडियाची बॅटिंग

राजेश कन्नूर हा टीम इंडियाच्या विजयाचा शिल्पकार ठरला. राजेशने सलग दुसरं अर्धशतक झळकावलं. राजेशने बुधवारी १५ जानेवारीला श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात ६० धावा केल्या होत्या. त्यानंतर आता राजेशने ५२ बॉलमध्ये नॉट आऊट ७४ रन्स करत टीम इंडियाला विजयी केलं. तर पाकिस्तानकडून वाकिफ शाह याने २३ धावा देत २ विकेट्स घेतल्या.

पहिल्या डावात काय झालं?

त्याआधी पाकिस्तानने टॉस जिंकून बॅटिंगचा निर्णय केला. पाकिस्तानने २० ओव्हरमध्ये ५ विकेट्स गमावून १३८ धावा केल्या. पाकिस्तानसाठी सैफ उल्लाह याने अर्धशतक ठोकलं. सैफने ५१ बॉलमध्ये ५८ रन्स केल्या. एम नोमान याने ४२ चेंडूत ४५ धावा जोडल्या. तर टीम इंडियासाठी जितेंद्र हीने ४ ओव्हरमध्ये २५ रन्स देत सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या.

दरम्यान टीम इंडियाचा हा या स्पर्धेतील सलग चौथा विजय ठरला. टीम इंडियाने या स्पर्धेत १२ जानेवारी रोजी पाकिस्तानला पराभूत करत विजयी सलामी दिली. त्यानंतर इंग्लंडला २९ धावांनी लोळवलं. बुधवारी १५ जानेवारीला श्रीलंकेला पराभूत केलं.